|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १० अंक : ५१ सोमवार दि. १२ डिसेंबर २०२२ ते रविवार दि. १८ डिसेंबर २०२२ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## भिवंडीत झाला गोळीबार ठेकेदाराला केले ठार



भिवंडी/अभिजित हिरे

भिवंडी तालुक्यातील कशेळी येथे अज्ञातांनी केलेल्या गोळीबारात तरुणाचा ठाणे येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना सायंकाळी उशिरा घडली आहे. गणेश कोकाटे वय ३३ असे हत्या झालेल्या युवकाचे नाव आहे. ठाणे येथील कामगार पुरविण्याचे काम करणाऱ्या दोघां मधील वाद विकोपाला जाऊन त्यामधून एकाची हत्या झाली आहे. ठाणे येथील ...पान ६ वर

## मंदिरातील पावित्र्याला व्यासनी लोकांची बाधा झाली गांजाडू साथीदारांनी पुरोहिताची निर्घृण हत्या केली?

वैजापूर/क्राईम रिपोर्टर



**वैराग्याचे जीवन जगणाऱ्या साधू महात्म्यांच्या विषयी समाजाच्या मनात एक आदरभाव असतो. अशावेळी त्या साधुंनीही आपले चारित्र्य जपायचे असते. आपल्या साध्या आणि सोजवळ राहणीमानातून समाजासमोर एक आदर्श निर्माण करायचा असतो. धर्म संस्कृतीचे जतन करताना आपल्या हातून कोणतेही अनुचित कृत्य घडणार नाही याची काळजी घ्यायची असते. पूर्वीचे साधू महात्मे या सगळ्या गोष्टी प्राणापलीकडे जपायचे. त्यामुळे लोकांच्या मनात त्यांच्या विषयी एक आदराची भावना असायची. त्यांच्यावर लोकांची श्रद्धा असायची आणि याच श्रद्धेतून लोक त्यांच्याकडे जायचे, त्यांची पूजा करायचे, त्यांचे आशीवार्द घ्यायचे, पण आता मात्र चित्र बदलले आहे. कारण अनेक ठिकाणी साधूच्या वेशात भोंदूबाबा निर्माण झालेत आणि लोकांना चांगला मार्ग दाखवण्यायेवजी लोकांची फसवणूक करीत आहेत. साधू महंत म्हटला कि त्याला कोणतेही व्यसन नसते, पण आजकालचे काही साधू चरस, गांजा व अफिमसह गुपचूप दारूही प्यायला लागले आहेत. वैजापूरमध्ये एका छोट्या मंदिरात राहणाऱ्या एका पुरोहिताकडे नेहमी व्यसनी लोकांचे येणे जाने असायचे. तिथे मैफिली रंगायच्या दारू आणि गांजाचा धूर निघायचा. यातूनच शुक्रवारी रात्री त्या पुरोहिताबरोबर तिथे येणाऱ्या गांजाडूंचा वाद झाला होता आणि दुसऱ्या दिवशी त्या पुरोहिताचा मृतदेह मंदिराच्या मागे आढळला. मृतदेहाच्या अंगावर जखमा होत्या. याचा अर्थ त्याची कुणीतरी हत्या केली असा पोलिसांना संशय असून या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे. मात्र या घटनेमुळे संपूर्ण वैजापूमध्ये मोठी खळबळ माजली आहे.**

वैजापूरमध्ये पुरोहिताची हत्या करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. वैजापूर हरालगतच्या नारंगी मध्यम प्रकल्प परिसरात मंदिरात पौरोहित्य करणाऱ्या ५५ वर्षीय पुरोहिताची हत्या करण्यात आल्याची घटना शुक्रवारी समोर आली आहे. हत्येचा उलगडा अद्याप झाला नसला तरी, पुरोहिताच्या हातासह डोक्यावर मारहाणीच्या खूणा दिसून आल्या, तसेच घटनास्थळी रक्ताचे डाग आढळून आले. कैलाश गणपत चव्हाण (रा. बुरुडगाव रोड, भोसले आखाडा, अहमदनगर) असे खून झालेल्या पुरोहिताचे नाव आहे. वैजापूर शहरानजीकच्या नारंगी मध्यम प्रकल्प परिसरात गवळीबाबा मंदिर आहे. या मंदिराजवळ असलेल्या एका झोपडीत पुरोहित कैलास चव्हाण वास्तव्यास होते. गेल्या दीड वर्षापासून या मंदिरात पौरोहित्य करून ते तेथेच राहत असल्याचे परिसरातील नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान शुक्रवारी दुपारच्या सुमारास परिसरातील एका शेतकऱ्यास मंदिराच्या पाठिमागील बाजूस पुरोहिताचा मृतदेह दिसला. त्याने घटनेची माहिती तात्काळ वैजापूर पोलिसांना दिली. घटनेची माहिती मिळताच वैजापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी चव्हाण यांचा मृतदेह गवळीबाबा मंदिराच्या बाजूला असलेल्या झाडाझुडुपात पोलिसांना आढळून आला. पाहणीदरम्यान घटनास्थळी पोलिसांना रक्ताचे डाग, सायकल व थोड्याच अंतरावर काठीही आढळून आली. याशिवाय याच ठिकाणी असलेल्या एका पिशवीत 'वशीकरण' शीर्षक असलेले पुस्तकही पोलिसांना आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी पंचनामा करत, पुढील तपास सुरु केला आहे. पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करत पंचनामा केला आहे. यावेळी पोलिसांना घटनास्थळी चिलीम, गांजाच्या झाडाची पाने व सायकलही आढळून आले. त्यामुळे गुरूवारी रात्री पुरोहितासोबत अन्य कुणीतरी घटनास्थ होते, असाही संशय पोलिसांनी वर्तविला. पुरोहिताचा खून कुणी, कशासाठी व का केला? याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे. तर गुरुवारी रात्री मंदिर परिसरात आरडाओरड सुरू होती, असे काही नागरिकांनी पोलिसांना सांगितले आहे. त्यामुळे पोलिसांकडून त्यादृष्टीने तपास सुरु आहे. कैलाश चव्हाण यांचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. तर घटनास्थळी काही संशयास्पद वस्तू आढळून आल्या आहेत. सोबतच पुरोहिताच्या हातासह डोक्यावर मारहाणीच्या खूणा दिसून आल्या, तसेच घटनास्थळी रक्ताचे डाग आढळून आले. तर परिसरातील नागरिकांना मध्यरात्री मंदिर परिसरात आरडाओरड ऐकू येत होती. त्यामुळे कैलाश चव्हाण यांची हत्या झाली असल्याचं स्पष्ट होत असून, त्या दृष्टीने पोलिसांकडून तपास सुरु आहे. दरम्यान पुरोहिताच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी एका संशयीताला अटक केली आहे.

## वेगळे राहणाऱ्या पत्नीने दुसऱ्याला पटवले पतीला ठार मारून तिने मार्गातून हटवले

औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर

**कोणतीही वाई किंवा पुरुष अधिक काळ शरीर सुखापासून वंचित राहू शकत नाही. पती पासून वेगळी राहणाऱ्या सारिकाचे सुद्धा असेच झाले होते. त्यातूनच तिच्या जीवनात सागर आला आणि तिच्या जीवनात आनंदाचा बहर आला. तर दुसरीकडे तिचा पतीही तिच्या सोबत जवळीक साधण्याचा प्रयत्न करू लागला. पण तिला आता तो नको होता. म्हणून तिने प्रियकराच्या मदतीने सपळा रचून त्याला भर रस्त्यात ठार मारले. मात्र पोलिसांनी मोठ्या शिताफिने आरोपींना अटक केली आहे.**



मयत विजय



संशयीत आरोपी सागर आमि सारिका

विजय संजयकुमार पाटणी (वय ३५) हा आपल्या कुटुंबियांसमवेत एन-११ मध्ये रहात होते. त्यांचा डिजिटल बिझनेस कार्ड व मिनी वेबसाइट नावाने व्यवसाय होता. व्यवसाय करत असतांनाच विजयची ओळख सारिकाशी झाली. याच ओळखीचे पुढे प्रेमात रूपांतर झाले. त्यानंतर त्यांनी विचार करून २०१० मध्ये प्रेमविवाह केला. सुरुवातीची काही वर्ष आनंदात गेली, नंतर मात्र त्यांच्यात सातत्याने खडके उडू लागले. यादरम्यान दोघांचे संसारात वेलीवर एक चिमुकले फुल उमलले होते. त्यांना एक मुलगी आहे, मात्र त्यांच्यात संशय व नोकरीवरून मतभेद झाले. परिणामी सारिकाने वेगळे होण्याचा निर्णय घेतला. पदवीचे शिक्षण घेतलेल्या सारिकाने टॅली करून वाळूजमध्ये नोकरी मिळवली. तिथे ती मुलीसोबत राहू लागली. नोकरी करून उदरनिर्वाह चालवू लागली, पण तिचा पती विजय तिला सोडण्यास तयार नव्हता. त्याला पत्नीची व मुलीची आठवण येत असे, त्यामुळे तो तिला भेटायला येत असे. त्याला टाळण्यासाठी तिने कुवेतला जात असल्याचे सांगितले होते. पतीला सोडून आली असली तरी सारिकाच्या मनात पुरूष सुखाची लालसा होतीच. तरूण वयात तिला एकटीला जगणे कठीण वाटत होते. दिवसभर कामात जात असे, पण रात्रीच्या एकांतात तिला पुरूषसुखाची आठवण येत असे. एखाद्या पुरूषाच्या मिठीत रमून जावे असे तिला वाटत असे. तिला एकटीचा सहवास काहीसा जड जात होता त्यामुळे आधार शोधण्याच्या प्रयत्नात असलेल्या सारिकाची ओळख फेसबुकवरून सागरशी झाली. फेसबुकवरील चॅटिंग दरम्यान दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले. सारिकाला आता सागरच्या रूपाने नवा आधार मिळाला होता. बीएससीचे शिक्षण घेतलेला सागरही सारिकाच्या रूपावर भाळला होता, त्यामुळे त्यानेही तिच्या प्रेमाचा स्वीकार केला. जमेल त्या वेळात हे ...पान २ वर

## अभिनेत्रीच्या आयुष्याची शोकांतिका झाली संपत्तीच्या वादातून मुलाने आईची हत्या केली

मुंबई/क्राईम रिपोर्टर



**संपत्तीचा वाद कुटुंबातील नात्यागोत्यासाठी अत्यंत हानिकारक असतो. त्यामुळे हे वाद लवकर मिटवायचे असतात. कारण आजकाल लोकांना पैसा महत्वाचा वाटतो आणि पैशांसाठी त्याची कोणत्याही थराला जायची तयारी असते. मुंबईतील अशाच एका घटनेत संपत्तीच्या वादातून एका माथेफिरू मुलाने आपल्या जन्मदात्या आईची हत्या केली. विशेष म्हणजे मयात महिला एक अभिनेत्री होती. या प्रकरणी पोलिसांनी तिच्या मुलाला अटक करण्यात आली आहे.**

मनोरंजन विश्वातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. लोकप्रिय टीव्ही अभिनेत्री वीणा कपूरबाबत ही धक्कादायक बातमी आहे. वीणा कपूरच्या मुलाने तिची हत्या केल्याची बातमी समोर आली आहे. त्यामुळे सगळीकडे एकच खळबळ उडाली आहे. ७४ वर्षीय वीणा कपूरची हत्या तिच्या स्वतःच्या ४३ वर्षीय आरोपी मुलाने केली आहे. अभिनेत्रीच्या मृत्यूची माहिती तिची सहअभिनेत्री नीतू कोहलीने दिली आहे. यामागचं कारण ऐकूनही तुम्हाला मोठा धक्का बसेल. वीणा कपूर यांना बॅटने मारहाण करुन त्यांच्या मुलाने खून केला. जमिनीच्या वादातून मुलाने आपल्या ७४ वर्षीय ...पान ६ वर

## घराच्या वाटणीचा वाद विकोपाला गेला सख्ख्या भावानेच भावाचा खून केला

चिक्कोडी/क्राईम रिपोर्टर

**आजकाल माणसाला धन संपत्तीचा इतका मोह असतो कि पैशासमोर रक्ताची नातीही फिकी पडतात. मुलगा आई-वडिलांच्या तर भाऊ भावाच्या जीवावर उठतो. चिक्कोडी येथे घर विकून त्याची वाटणी करण्याच्या वादातून दोन भावांमधील वैर इतके विकोपाला गेले कि रक्ताच्या नात्याचा जराही विचार न करता एकाने दुसऱ्याची हत्या केली आणि स्वतःच पोलिसांसमोर हजार झाला.**



मयत अकबर



चिक्कोडी जवळ कब्बुर येथे अकबर शेख आणि अमजद शेख हे दोघे सख्खे भाऊ राहयला आहेत. दोघांची ही लग्न झाली असल्याने दोघांना तसा संसार हा होता. वडिलार्जीत घरात राहत असल्याने दोघात प्रॉप्रटीच्या वादातून नेहमी भांडण तंटा हा होत असायचा. वडिलांचे वय झाल्याने ते शेती बघत नव्हते. ती शेती अमजद हा बघत होता. तर अकबर हा गावातच बॅटरीचे दुकान चालवित होता. अमजद याला दारू पिण्याचे व्यसन असल्याने तो दारू पिऊन आला की भाऊ अकबर बरोबर मला माझी वाटणी पाहिजे बघ. तु मला वाटणी करून दे नाही तर मी काही तुला सोडत नाही असे म्हणून त्याच्या अंगावर त्याला मारायला जात होता. अकबर ही अंगा पिडांने मजबुत असल्याने तो अमजदला ऐकत नव्हता. तो ही त्याला मारहाण करीत होता. त्यामुळे अमजद त्याचेवर चिडून होता. वडिलार्जीत घरात आपल्याला वाटणी कमी मिळाली आहे अशी त्याची समजूत झाली होती. घराचा वडिलार्जीत बॅटरीचा धंदा हा मोठा भाऊ अकबर बघत असल्याने त्याचे उत्पन्न जास्त होते. त्यामुळे त्याची बायका मुले सुखात राहत आहेत त्यामानाने आपण आपली बायको मुले कायम कष्टच करीत आहोत याची त्याला खंत होती. ...पान २ वर

## दारू मागता मागता यमसंदनी गेला दारूड्याचा घात अखेर दारूनेच केला



मुंबई/एस.कुमार

**काही लोक दारूसाठी इतके लाचार झालेले असतात कि कुणाकडेही दारूसाठी हात पसरतात. मात्र धारावीत एका अनोळखी माणसाजवळ दारू मागणे एका दारुड्याला चांगलेच महागात पडले आणि ज्याच्याकडे दारू मागितली त्याने दारूच्या बाटलीच्या फुटलेल्या काचेनेच दारुड्याचा जीव घेतला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.**

दिनांक २७ नोव्हेंबर २०२२ चा तो दिवस. सकाळी ७ वाजताची वेळ. धारावी येथील शाहूनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत थंगमनन मंदिरा समोर आण्णानगर, जगनजिवन राम चाळ, आंबेडकर शाळेजवळ, धारावी क्रॉस रोड येथे एक इसम रक्ताचे थारोळ्यात रक्तबंबाळ अवस्थेत पडला असल्याची माहिती शाहूनगर पोलिसांना मिळाली. घटनेची माहिती मिळताच पोलीस पथक तातडीने ...पान २ वर

## अनैतिक संबंधात पत्नीने साधला नेम प्रियकराला सांगून पतीचाच केला गेम

बेळगावी/क्राईम रिपोर्टर



मयत रमजान

**अनैतिक संबंधाला चटावलेली बाई समाज किंवा संसाराचा अजिबात विचार करीत नसते. तिला फक्त ते सुख हवे असते आणि पतीपेक्षा तिला जो अधिक सुख देतो त्याच्यासाठी ती वाटेल ते करायला तयर होते. गोकाक येथील सन्नाचे सुद्धा असेच झाले होते. तिला पतीपेक्षा तिच्या माहेरचा पूर्वीचा प्रियकर अधिक आवडत होता. त्यामुळे ती सतत त्याला भेटायला माहेरी जात असे. पण जेंव्हा हि गोष्ट पतीच्या लक्षात आली तेव्हा त्याने विरोध करायला सुरुवात केली. त्यामुळे आपल्या अनैतिक संबंधात अडथला ठरणाऱ्या पतीला तिने प्रियकराच्या हातून संपवले. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.**



आरोपी महंमदरझा इनामदार व सन्ना

बेळगावी शहरातील वैभवनगर येथील सन्ना हिचा विवाह मुस्लीम समाजाच्या रिती रिवाजानुसार गोकाक येथील रमजान बशीर अहमंद सन्ना याच्या बरोबर गेल्या चार वर्षापूर्वी झाला. ती दिसायला देखणी आणि सुंदर होती. या दाम्पत्यांना अडीच अडीच वर्षाचा मुलगा ही आहे. लग्नाअगोदर तिचे बेळगाव शहरातील रुक्मिणी नगर येथील महंमदरझा इनामदार याच्या बरोबर प्रेम संबंध होते ते संबंध तिने लग्नानंतर ही त्याचेबरोबर प्रेमसंबंध चालूच ठेवले होते. ही गोष्ट तिचा पती रमजान याला माहित नव्हती.तो दिवसा सकाळी कामावर गेला की रात्री उशिराच घरी परतत होता. त्याला त्याच्या पत्नीवर विश्वास होता. पण सन्ना ही त्याच्या पाठीमागे प्रियकर महंमदरझा याच्या बरोबर गुलछर्रे उडवित होती. ती लग्नानंतर ही प्रियकर महमंदरझाला विसरू शकत नव्हती. त्याला ...पान २ वर

## संशयाचा किडा डोक्यात शिरला संतप्त पतीने पत्नीचा गळा चिरला

हातकणंगले/क्राईम रिपोर्टर



**संसारात संशयाची पाल चुकचुकली कि मग संसाराची घडी विस्कटायला वेळ लागत नाही. अशा वेळी पत्नीने पतीच्या मनात संशय निर्माण होऊ नये म्हणून किमान घरात तरी चांगले वागणे आवश्यक असते. पण वडगाव येथे राहणारी कविता तासंतास आपल्या प्रियकराच्या सोबत फोनवर बोलायची, त्यामुळे तिच्या पतीचा तिच्यावरचा संशय वाढला आणि तो तिला मारहाण करू लागला. मात्र त्यानंतरही तिच्या वागण्यात सुधारणा झाली नाही. त्यामुळे त्याने भर रस्त्यात पत्नीची गळा चिरून हत्या केली.**

शिरोळ तालुक्यातील निमशिरगाव येथील चंद्रकांत कोरवी याचे लग्न गेल्या १२ वर्षापूर्वी कविता कोरवी हिच्याबरोबर समाजाच्या रिती रिवाजानुसार झाला होता. या दोघांना ही दोन मुले असून पहिला मुलगाहा सातवीत शिकत असून तो आपल्या आजीकडे निमशिरगावला राहतो तर दुसरा मुलगा, चंद्रकांत आणि त्याची पत्नी कविता हे तिघे जण हातकणंगले तालुक्यातील मौजे वडगाव येथे राहयला आहेत. मौजे वडगाव हे चंद्रकांत याचे ...पान ६ वर

## उसन्या पैंशाच्या वादातून मैंत्रीला तडा गेला जिवलग मित्राच्या हातून रिक्षाचालक मेला

मिरज/क्राईम रिपोर्टर



मयत ऋषीकेश

**मैत्रीत कधीही पैशाचे व्यवहार करू नयेत आणि उसनवार केले तरी ताबडतोब घेतलेले पैसे परत करून व्यवहार मिटवायचा असतो. कारण आर्थिक व्यवहारातून मैत्रीही तुटते आणि वाद वाढला तर एखाद्याचा जीवही जातो. मिरजमध्ये असेच घडले ऋषिकेश आणि अक्षय हे दोन चांगले मित्र होते. ऋषिकेश रिक्षा चालक होता आणि अक्षयने त्यांच्याकडून उसने पैसे घेतले होते. मात्र ते वेळेवर न दिल्याने दोघांमध्ये वितुष्ट आले आणि ऋषिकेशच्या पैशाच्या तगाद्याला कंटाळून एके दिवशी अक्षयने आपल्या दुसऱ्यामित्राच्या मदतीने ऋषिकेशची हत्या केली.**



आरोपी अक्षय पिसाळ व दीपक हलवाई

ऋषीकेश जाधव हा मिरज शहरातील घोरपडे वाडा येथे राहयला आहे. तो रिक्षा चालवून आपल्या कुंटूबाचा उदरनिर्वाह करीत होता. तो आपला रिक्षाचा व्यवसाय करीत असताना आपल्या मित्रांच्या संगतीने दारू पित होता. त्याचे जवळचे मित्र दीपक हलवाई आणि अक्षय पिसाळ हे होते. हे तिघे ही जवळचे चांगले मित्र असल्याने सारखे दारू प्यायला एकत्र बसत होते. आता जवळचे मित्र असल्याने त्याच्यात चेष्टा मस्करी ही चालत असायची. त्या चेष्टा मस्करीतून ते एकमेकांना शिव्या ही देत होते. पण ते कुणी सहसा मनावर घेत नव्हते. ...पान ६ वर

12 TO 18 DECEMBER 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 12/10/2022 8:45 PM Page 1



पान १ वरून....

## वेगळे राहणाऱ्या पत्नीने दुसऱ्याला...

दोघे एकमेकांशी प्रेमाच्या गप्पा रंगवू लागले. तारूण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या सागरला तिचा सहवास अधिकच आवडू लागला. नव्या दमाचा सागर मिळाल्याने आता सारिकाही अधिक खुष झाली होती. त्याच्या सहवासात तिने अनेक दिवसांचा एकटेपणा घालवण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. सारिकाच्या स्पशनि सागर मनोमन अधिकच खुलून निघत होता. एकांतात होत असलेल्या भेटीदरम्यान त्याने त्याला हव्या वाटणाऱ्या सुखाची मागणी केली. तिनेही त्याला मुक संमतीने प्रतिसाद देण्यास सुरुवात केली. विवाहित असल्याने प्रणयक्रिडेत तरबेज असलेल्या सारिकाने आपला देखणा देह त्याच्या स्वाधीन केला. सागरसाठी हे सगळे नवीन आणि हवेहवेसे होते. तिच्या नग्न दर्शनाने तो पिसाट झाला. तिला मिठीत घेऊन तिच्यावर चुंबनांचा वर्षाव करू लागला. ती अधीर झाली होती. पुरुषाच्या सुखापासून वंचित राहिल्यामुळे तिला कधी एकदा साडून घेतो असे झाले होते. ती आवेगाने त्याला भिडली. चुंबनाने त्याची उत्तेजना वाढवू लागली. आधीच तो कामातूर झाला होता, तिच्या चाळ्यांनी त्याचा संयम संपला, तो तिच्या मादक देहावर तुटून पडला. दोन देह एक झाले. एकमेकाला रगडू लागले. कामवासनेला उधाण आले. दोघांनी जोरजोराने आवेगाने शरीरसुख घेतले. वासना शांत झाल्यानंतर ते बाजूला झाले, पण हे बाजूला होणे काही क्षणापुरतेच होते. त्यांनी कायमचे एक होण्याचा निर्णय घेतला होता. हे दोघेही प्रेमाच्या विश्वात रममाण झाले असतांनाच तिकडे विजयला सारिका औरंगाबादमध्येच असल्याची माहिती मिळाली. तोही चार महिन्यांपासून पत्नीच्या स्पर्शापासून दुरावला होता. त्यालाही आता तिच्या भेटीची ओढ लागली होती. तो तिला भेटत होता, एकत्र रहाण्याचा आग्रह करत होता. पण नव्या दमाचा सागर भेटल्याने सारिकाला पती विजयसोबत रहाणे आवडत नव्हते, त्यामुळे ती त्यालासारखे टाळू लागले. पत्नी आपले काही ऐकत नाही म्हणून विजय तिला रस्त्यावर अडवत मारहाण करू लागला, त्यामुळे सारिकाही पूर्णपणे वैतागली होती. सागरच्या बाहूपाशात घालवलेला प्रत्येक क्षण तिला अधिक सुखाचा वाटत होता. त्यामुळे आता सागर सोबतच रहाणे तिने पसंत केले होते. मात्र दिवसेंदिवस विजयचा अडसर हा अधिकच डोकेदुखी ठरत होता. तिने आपल्या प्रेमातील हा काटा दूर करण्याचा निर्णय घेतला. तिच्या शरीरासाठी चटावलेला सागरही तिच्याशी सहमत झाला. दोघांनी मिळून एक खतरनाक प्लॅन केला. गुन्हेगारी मालिका बघून त्या दोघांनी अत्यंत नियोजनबध्द खुनाचे कारस्थान रचले, पण वास्तवात सगळे वेगळेच घडते त्याची त्यांना जाणीव नव्हती. त्यांनी डोळ्यावर मारण्याचा स्प्रे आणि एक धारदार चाकू विकत घेतला. आता कुठल्याही प्रकारे विजयला आयुष्यातून संपवून टाकायचे हे त्यांनी मनोमन ठरवले होते. यासाठीची पूर्ण तयारी आणि प्लॅनिंग तयार होते. नेहमीप्रमाणे विजयने सकाळीच सारिकाला फोन केला. आत्ताच्या आत्ता मला भेटायचे आहे अशी बळजबरी त्यांनी केली. सुरूवातीला सारिकाने नकार दिला, मात्र विजय अधिकच तगादा लावू लागल्यामुळे तिने आजच विजयचा काटा काढायचा असे ठरवले. तसे तिने सागरलाही कळवले. दि. १८ ऑक्टोबर रोजी सारिकाने विजयला भेटण्यास होकार दिला. तुम्हाला हवे ते सगळे करू असे सांगून त्याला बोलावले. तो तिला भेटला. दोघेही संध्याकाळी उशिरापर्यंत फिरले. त्यानंतर तिने दारू पिण्याचा आग्रह धरला. त्याने दोघांसाठी दारू घेतली. दोघेही धुळे-सोलापूर रस्त्याने निघाले. पत्नी आता खरोखरच आपल्याजवळ रहाणार असल्याचे त्याला जाणवत होते. यात संधीचा फायदा घेत तिने त्याला दारू पिण्याचा आग्रह धरला. चार-पाच महिन्यानंतर आपली बायको सोबत आहे या कल्पनेनेच तो आनंदला होता. तिला पाहिजे ते करण्यास तो तयार होता. तीही त्याच्याबरोबर दारू पित होती, त्यामुळे त्याला तिच्यावर संशय आला नाही. काळोख वाढू लागला. तसे ते पुन्हा दुचाकीवरून पुढे निघाले. सारिकाने वाल्मी नाक्याजवळ असलेल्या उड्डाणपुलानजीक त्याला गाडी थांबवण्याचा सांगितले. त्याने गाडी थांबवली. या परिसरात कोणीही नाही हीच संधी साधण्याचे सारिकाने ठरवले. त्याठिकाणी आधीच तिचा प्रियकर सागर दबा धरून बसला होता. तो थोड्या अंतरावर दिसताच ती तयार झाली. तिने पती विजयच्या डोळ्यावर स्प्रे मारला. तो गोंधळला, पण त्याला सावरण्याची संधी देण्याआधीच तिने त्याच्यावर हल्ला केला. तितक्यात सागर धावतच तिथे आला. त्याने विजयचे दोन्ही हात पकडून ठेवले, पण सारिका गोंधळली होती. ती घाबरली असल्यामुळे तिने केलेला चाकूचा पहिला वार सागरच्याच हातावर झाला. सागरने तिला विजयवर वार करण्यास धमकावले. तसे तिने विजयच्या पोटात जोरात धारदार चाकूचे वार केले, त्यामुळे विजयला सावरण्याची संधीच मिळाली नाही. काही वेळात तो रक्ताच्या थारोळ्यात खाली पडला. तो पूर्णपणे मेल्याची खात्री झाल्यानंतर रात्री उशिरा त्या दोघांनी विजयचा मृतदेह दाट झाडीमध्ये फेकून दिला. विजयचा काटा काढला होता, पण हे प्रकरण अंगलट येणार नाही याचीही काळजी घ्यावी लागणार होती. त्यातच सागरच्या हातावर वार झाल्याने रक्त येत होते, त्यामुळे घटनास्थळापासून जवळच्या अंतरावरच सागरची दुचाकी लावण्यात आली, तर विजयची दुचाकी घेऊन सागर आणि सारिका तिथून सटकले. ते सागरच्या कंपनीत गेले. कंपनीत हाताला अपघातात मार लागल्याचे सांगून कंपनीतील कपडे घेतले. ते कपडे. घालून ते दवाखान्यात गेले. तिथे मशिनमध्ये हात अडकल्याचे सांगून डॉक्टरांकडून उपचार करून घेतला. त्यानंतर ते विजयच्या दुचाकीनेच शहरातून बाहेर पडले. ते शिर्डीला पोहचले. तिथे विजयची दुचाकी सोडून ते परत आले. दुसऱ्या दिवशी सागरने घटनास्थळालगतची स्वतःची दुचाकी परत आणली. दुसरीकडे सारिकाने मोठ्या चलाखीने पोलीस ठाण्यामध्ये पती विजय हरवल्याची तक्रार नोंद केली, त्यामुळे आपण केलेले पाप उघडकीस येणार नाही असे तिला वाटत होते. दि. २२ ऑक्टोबरला एम.आय.डी.सी. वाळूजमध्ये जाऊन पती बेपत्ता झाल्याची तक्रार दिली. त्यात आम्ही दि. १८ ऑक्टोबर रोजी पैठण, पडेगाव येथे फिरून मला १० वाजता घरी सोडून गेल्यानंतर पती बेपत्ता झाल्याचे म्हटले. विशेष म्हणजे खून केल्यानंतर सारिकाने सासूची भेट घेतली. विजय लवकर परत येतील '' असा आधारही दिला. शुक्रवारी वाल्मी परिसरात अनोळखी मृतदेह असल्याचे समोर आले. शनिवारी शवविच्छेदनात खून केल्याचे स्पष्ट झाल्याने पोलिसांसमोरचे आव्हान वाढले. सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल दुमे गुन्हे शाखेचे निरीक्षक अविनाश आघाव, गीता बागवडे, उपनिरीक्षक अमोल म्हस्के, कल्याण शेळके, गजानन सोनटक्के, साताऱ्याचे सर्जे राव सानप, नंदकुमार भंडारी यांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. पथकाने सर्वप्रथम तांत्रिक तपासावर भर दिला. त्यानंतर शहरातील सर्व ठाण्यांमधील बेपत्ता तक्रारींचे विश्लेषण सुरू केले. सुमारे ९० बेपत्ता तक्रारींचे विश्लेषण केल्यानंतर एम. आय. डी. सी. वाळूजमध्ये दि. २२ ऑक्टोबर रोजी एका बेपत्ता तक्रारीत हातावर ओम असल्याचा उल्लेख समोर आला व तपास त्या दिशेने केला. सारिकाने स्वतः विजय बेपत्ता असल्याची तक्रार दिली होती. पोलिसांनी तिचे घर गाठून चौकशी केली. त्यात तिने सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र उत्तर देतांना ती अडखळायला लागताच संशय बळावला. त्यानंतर तांत्रिक तपासात तिला प्रियकर असल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी रविवारी सागरला ताब्यात घेतले असता त्याने खुनाची कबुली दिली. विजय यांची आई वृद्ध असून वडीलांना अर्धांगवायू झाला आहे. त्यांना रविवारपर्यंत मुलाच्या खुनाची कल्पना नव्हती. सहाय्यक फौजदार सतिश जाधव, शेख हबीब, सुधाकर मिसाळ, संजय मुळे, राजेंद्र साळुंके, नवनाथ खांडेकर यांच्या पथकाने कारवाई केली. विजय पाटणी (वय ३५) याच्या खूनप्रकरणी त्याची पत्नी सारिका पाटणी (वय ३२), सागर मधुकर सावळे (वय २५, रा. शिवाजीनगर) यांना अटक करण्यात आली. अधिक तपास पोलीस करत आहेत.

## घराच्या वाटणीचा वाद विकोपाला...

तसे तर शेतीच्या उत्पन्नात घर चालविणे ही आजकाल कठिण होऊन बसले आहे ज्याचे त्याला ही होत नाही त्यामुळे आपण कर्जबाजारी झालो आहोत आपण आपली वडिलार्जीत घर विकून कर्ज भागवयाचे आणि दुसरीकडे राहयला जायचे असा त्याने सारासार विचार केला होता. या कारणातून तो भाऊ अकबरबरोबर वाद घालून आपली वाटणी मागत होता. पण अजून आई वडिल हयात असल्याने वाटणी कशाला करायची असा अकबरने विचार केला होता. त्याला वडिलार्जीत घर किंवा शेती विकणे आणि त्यातून कर्ज भागविणे पटत नव्हते.तो अमजद याला तु शेती बरोबर दुसरा काही तरी कामधंदा बघ. त्यातून कर्ज फेड असा तो सल्ला देत होता.पण दारूच्या व्यसनाच्या आहरी गेलेल्या अमजदला त्याचा सल्ला पटत नव्हता. त्याच्या डोक्यात एकच विचार यायचा तो म्हणजे वडिलार्जीत घर किंवा शेती विकायची आणि आपले कर्ज फेडायाचे.याला फक्त भाऊ अकबर याचा विरोध होता. तो घराची किंवा शेतीची वाटणी ही करीत नव्हता आणि त्याला ती प्रॉप्रटी विकू ही देत नव्हता. दोघांची भांडणे ही विकोपाला गेली होती. बऱ्याच जणांनी त्याची भांडणे वेळोवेळी मिटवली ही होती. पै पाहुण्यांनी ही त्याच्या भांडणात हात टेकले होते. दोघे ही सांगून एकेत नव्हते. अमजद तर अकबरला पाण्यातच बघत होता. काही करून आपली वडिलार्जीत प्रॉप्रटी विकायचीच या इरादयाने तो पेटला होता.तो कोणाचेच काही ऐकत नव्हता.कसे तर करून त्याने वयोवृध्द आई वडिलांना तयार केले होते.पण या सगळ्यात अकबर हा अडकाठी ठरत होता.तो आई वडिलांना ही प्रॉप्रटी विकायला देत नव्हता. आता मात्र अमजद याची पंचायत झाली होती. अलिकडे तो दारू पिऊन अकबरला मारहाण करायला जात होता. अकबर ही त्याला त्याच पध्दतीने उत्तर देत होता. दोघांची भांडणे मिटता मिटत नव्हती. काय करावे म्हणजे आपला प्रश्न मिटेल असे अमजदला वाटत होते. तो आता भावाचाच कायमचा काटा काढण्याच्या विचारात होता. यासाठी तो कायम त्याच्या मागावर राहत होता. तो कधी कुठे जातो याची त्याला चांगली माहिती होती. त्याला मारण्याची संधी तो शोधत होता. तशी संधी त्याला लवकरच मिळाली. अकबर हा शनिवार दुपारी ४ वाजणेच्या सुमारास आपल्या दुचाकी गाडीने कब्बुरहून चिक्कोडीला कामानिमित्य जात होता. याच संधीचा फायदा घेतला. तो आपल्या एका मित्राची कार घेतला. त्या कारने तो भाऊ अकबर याचा पाठलाग करू लागला. तसे कब्बुर आणि चिक्कोडी हे अंतर फारसे नव्हते. दोन्ही गावाच्या मध्ये उमराणी नावाचा घाट होता. दोन चार कि.मीच्या घाटात वाहनाची वर्दळ ही फारसी नव्हती. उमराणी घाटानजीक अकबर हा आपल्या दुचाकी गाडीने आला असता पाठीमागून त्याचा पाठलाग करीत अमजद हा येत होता.त्याने उमराणी घाटाच्या अलिकडे अकबर याला गाठले. त्याच्या दुचाकी गाडीच्या आडवी कार आडवी लावत त्याने त्याला अडविले. कार आडवी आल्याने अकबर याने दुचाकी गाडी रस्त्याच्या बाजुला लावली. त्यावेळी कारमधून अमजद हा उतरला. त्याने त्याला शिवीगाळ करीत त्याला काही कळायच्या आतच त्याने आपल्याकडील धारदार कोयत्याने अकबरच्या मानेवर हातावर आणि पोटावर सपासप वार केले. त्यासरशी अकबर हा ओरडतच रस्त्याच्या कडेला रक्ताच्या थारोळ्यात पडला. रागाच्या भरात असणाऱ्या अमजदने त्याच्यावर वार करणे चालूच ठेवले होते. खाली पडलेल्या अकबरच्या शरीरातून रक्ताच्या चिळकांडया लागल्या होत्या.तो त्याला शिवीगाळ करीत मारत होता. त्याचा कोयता ही रक्ताने माखला होता. तर कपडयावर रक्ताचे डाग पडले होते. रस्त्यावरून वाहने येत जात होती. काही जण काय झाले म्हणून पाहत थांबत होते.तर काही जण बघून ही न बघितल्याचे करीत पुढे जात होते. अमजदच्या हातात रक्ताने माखलेला कोयता होता. त्यामुळे पुढे जाण्याचे कुणी धाडस करीत नव्हते. बघता बघता त्या ठिकाणी गर्दी जमत होती. रागाने लाल बुंद झालेला अमजद त्या ठिकाणीच गर्दी बघून हातातील कोयता टाकून देत ये मेरा भाई है,इसने मेरे को बहुत तकलीप दी है इसलिए मैने इसको मारा म्हणत तेथून कार घेऊन निघून गेला. कुणी तरी या घटनेची माहिती चिक्कोडी पोलीसांना दिली. या घटनेची माहिती समजताच चिक्कोडी सीपीआय आर.आर. पाटील, पीएसआय यमन्नाप्पा मांग हे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेची माहिती घेऊन तपासाला सुरूवात केली.घटनास्थळी बघ्याची गर्दी वाढली होती. घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात अकबर शेख हा पालथा पडला होता. तर बाजुलाच त्याची दुचाकी गाडी उभी होती. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून या मृतदेह शवविच्छेदनासाठी चिक्कोडी येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना या घटनेनंतर संशयीत अमजद शेख हा स्वतःहून चिक्कोडी पोलीस स्टेशनला हजर झाला होता. त्यांने या घटनेची माहिती पोलीसांना देऊन आपण आपल्या भावाचा खून केल्याचे पोलीसांना सांगितले. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याच्याकडून खूनाचे कारण काय असे विचारले असता तो पोलीसांना कोणतेच स्पष्ट कारण सांगत नव्हता. त्यामुळे पोलीस ही काही वेळ संभ्रमात पडले होते. पोलीसांनी त्याला बोलते केले असता त्याने आपल्या वडिलार्जीत प्रॉप्रटीतून आपला त्याचेबरोबर वाद होत होता. तो आपल्याला प्रॉप्रटी विकू देत नव्हता. त्यामुळे आपले कर्ज फेडता येत नव्हते. त्यामुळे चिडून जावून मी अकबर शेख याचा धारदार हत्याराने वार करून खून केल्याचे सांगितले. त्याने आपल्या खूनाची कबुली दिल्यावर पोलीसांनी मयत अकबर शेख याच्या पत्नीकडून लेखी फिर्याद लिहून घेतली. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी अकबर शेख (वय ४०) याचा धारदार हत्याराने खून केल्या प्रकरणी अमजद शेख (वय ३८) याचे विरोधात आयपीसी कलम ३०२,३४सह गुन्हा दाखल करून त्याला मा.कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी बेळगाव येथील हिंडलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडन गुन्हयात वापरलेली कार आणि कोयता जप्त केला.अमजदने अकबर याचा खून याच कारणातून केला आहे की याला अन्य कोणते कारण याचा तपास पोलीस करीत आहेत. पण अमजदने तसा कबुली जबाब दिल्याने पोलीस त्या अनुषंगाने चिक्कोडी पोलीस या घटनेचा तपास करीत आहेत.जर जरा जमीन याची वाटणी जर संमतीने झाली तर ठिक नाही तर यातून वाद होऊन रक्ताचे पाट वाहतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## दारू मागता मागता यमसंदनी ...

घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी मृत अज्ञात व्यक्तिची पाहणी केली असता, त्याच्या मानेवर व गळ्यावर दारूच्या बाटलीच्या फुटक्या काचेच्या तुकडयाने बरेच वार केल्याचे दिसून आले. तसेच त्याचे गळ्यावर काचेने भोसकून त्यास जखमी करून रक्तबंबाळ केल्याचे दिसून आले. पोलिसांनी घटनास्थळचा पंचनामा करून तो मृतदेह शवविच्छेदनासाठी घाटकोपरच्या राजावाडी रुग्णालयात रवाना केला. दरम्यान पोलिसांनी मृतक व्यक्तीची ओळख पटविण्यासाठी धारावी परिसरात शोध मोहीम राबवली असता, मृतक तरुणा बद्दल माहिती मिळाली. बाबू कटेपल्ली असे मृतक तरुणाचे नाव असून तो धारावीतील ९० फिट रोडवर आईवडील आणि बहिणीसह राहत होता. बाबू हा अविवाहित होता. तो सफाई कर्मचारी म्हणून काम करीत होता. पण त्याला दारू पिण्याचा नांद होता. अशी माहिती पोलिसांना मिळाली. त्याच्या बहिणीच्या तक्रारीवरून अज्ञात आरोपी विरोधात शाहूनगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ३५७/२२ भा.द.वि. कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. या गुन्ह्याचा शाहूनगर पोलिसांबरोबर मुंबई गुन्हे शाखा कक्ष ५ चे पथक समांतर तपास करत होते . या पथकाने घटनास्थळा पासून काही अंतरावरील अस्पष्ट सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करून तांत्रिक विश्लेषण आधारे आरोपीचा ठाव ठिकाणा शोधून काढला. संशयित आरोपी हा गुन्हा करून त्याच्या मुळ गावी राज्य उत्तराखंड येथे पळून जाण्याच्या तयारीत असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकाला प्राप्त झाली. या पथकाने तातडीने हालचाली करून संशयित आरोपी हा गावी पळून जाण्याच्या तयारीत असताना त्यास डोंबीवली (प). जि. ठाणे परिसरातून ताब्यात घेतले. पोलीस ठाण्यात आणून त्याची कसून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. राकेश दोबाल असे या आरोपीचे नाव असून तो एकटाच धारावी या ठिकाणी राहत होता. त्याची आई आणि बहिणी गावी राहत असून राकेश हा मुंबईत शिंपीच्या हाताखाली मदतनीस म्हणून काम करीत होता.तो ही दारू पीत होता. दारूची तलल्फ आल्याने राकेश हा परिसरातील ताडीमाडी दुकानाजवळ बसला होता. यावेळी मयत बाबू कटेपल्ली हा तेथे आला आणि त्याच्याकडे दारू दे -दारू दे असे म्हणत प्यायला दारू मागू लागला. वास्तविक दोघेही एकमेकांना ओळखत नव्हते. पण दोघेही दारू पिणारे असल्याने त्या दिवशी दुर्दैवाने तडीमाडीच्या दुकानाजवळ भेटले. बाबूच्या हातात दारूची बॉटल होती, तो हलवत तो दारू दे दारू दे असे म्हणू लागला. यावरून त्या दोघात भांडण झाले. तितक्यात त्याच्या हातातील दारूची बॉटल खाली पडली आणि ती फुटली. तरी तो सारखा दारू दे दारू दे ओरडत होता. या गोष्टीचा राकेश दोबाल याला राग आला, त्याने फुटलेली काचेची बॉटल उचली आणि त्या काचेच्या बाटलीच्या तुकड्याने बाबूच्या मानेवर व गळ्यावर ५-६ वार केले. बाबू रक्ताच्या थारोळ्यात खाली पडला. त्यातच बाबू मरण पावला. ही घटना २७ नोव्हेंबर रोजी रात्री २.३० ते ३ च्या सुमारास घडली. अशाप्रकारे आरोपीचा कोणत्याही प्रकारे सुगावा नसताना तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे कक्ष ५ च्या पथकाने अथक परिश्रम घेवून खूनाच्या गुन्हयातील आरोपी राकेश दोबाल याला ४८ तासाच्या आत अटक करून गंभीर गुन्हयाची उकल केली. ही यशस्वी कामगिरी मुंबई पोलीस आयुक्त, विवेक फणसाळकर, पोलीस सह आयुक्त (गुन्हे), सुहास वारके, पोलीस उपआयुक्त (प्रकटीकरण), प्रशांत कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष ५ वे प्र.पो.नि. घनश्याम नायर, पो. नि. अजित गोंधळी, म.पो.नि. शहापुरकर (गोपनीय शाखा), स.पो.नि. अमोल माळी, पो.ना. सुनिल जाधव, पो.शि. गणेश काळे, सरफरोज मुलाणी तसेच चालक पो.ना. हरीश कांबळे यांनी पार पाडली.

## अनैतिक संबंधात पत्नीने साधला...

भेटण्यासाठी म्हणून ती नवऱ्याला काही तरी कारण सांगून सारखी बेळगावला आपल्या माहेरी येत होती. बायको सारखी माहेरी का जाते? आणि ती गेली की लवकर का परत येत नाही याचे कोडे रमजान याला पडले होते. त्याला ही तिची शंका येत होती. एकदा त्याने ती घरी नसताना तिचा मोबाईल चेक केला असता ती आपल्या मोबाईलवरून दिवसातून सात ते आठ वेळा एकाच नंबरावर बोलत असल्याचे दिसून येत होते.ती त्याच नंबरच्या व्हाटअॅपवर चॅटिग करीत होती. तो नंबर त्याने आपल्या मोबाईलवरील टुर कॉलर वर टाकून पाहिला असता तो नंबर बेळगाव शहरातील रुक्मिणी नगर येथील महंमदरझा इनामदार याचा असल्याचे समजले.त्यावेळेपासून तो पत्नी सन्नावर संशय घेऊ लागला होता. घरात दारू पिऊन येऊन तिच्याबरोबर भांडण काढून तिला मारहाण ही करू लागला.त्या भांडणात तो तिला तुझे कोणाबरोबर कसले संबंध आहेत सांग म्हणत होता. ती ही धीट होती. तिने कोणता आडपडदा न ठेवता नवरा रमजान याला सांगून टाकले की तिचे लग्नाअगोदर महंमदरझा याच्या बरोबर प्रेम संबंध असून आता ही ती त्याचेवरच प्रेम करीत आहे.माझे लग्न तुमच्याबरोबर जबरदस्तीने लावून दिले होते. ती नावाने तुझी बायको आहे पण मनाने मात्र मी महंमदरझा याची आहे.तिच्या तोंडून हे ऐकून रमजानची सटकलीच होती. त्यावेळी तो तिला काही बोलला नाही पण त्याच्या मनातून ती मात्र उतरली होती.तो ही तिच्यासोबत नाईलाजाने संसार करीत होता. त्याला आपल्या अडीच वर्षाच्या मुलाची काळजी होती. सन्ना मात्र बिनधास्त होती अलिकडे तर ती नवऱ्यासमोरच त्याला फोन लावून आपल्या भेटायला गोकाकला ये असे सांगत होती. तिचा हा बाहेरख्यालीपणा रमजान याला खटकत होता. पण तो काही करू शकत नव्हता. त्याने ही गोष्ट सन्नाच्या आई वडिलांना सांगितली. त्यांनी उलट त्यालाच समजावून सांगत आपली मुलगी तसली नाही तुम्ही उगाच तिच्यावर काही तरी खोटा आरोप करीत आहात असे म्हणाले. खरे तर त्यांना ही सन्नाचे प्रेमप्रकरण माहित होते. त्यांनी आपल्या मुलीचे हे प्रेमप्रकरण लपवून ठेवले होते. त्यात त्याचांच दोष होता. हे रमजानच्या लक्षात आले होते. सन्नाचा बाहेर ख्यालीपणा वाढतच चालला होता. ती प्रियकरालाच जास्त किंमत देत होती.नवऱ्याला ती काडीची किंमत देत होती. सारखे रमजानबरोबर भांडण काढून आपल्या माहेरी आठ आठ पंधरा पंधरा दिवस जात होती. या दरम्यान तिचे महंमदरझा बरोबर शारीरिक संबध येत होते. ती त्याला खेळवत होती.तो ही तिच्या जवानीचा फडशा पाडत होता. तिच्या लग्नानंतर ही ती त्याला वापरायला पाहिजे असल्याने ती सांगेल तसेच तो करीत होता. इकडे ती माहेरहून परत गोकाकला आली की नवऱ्याबरोबर तिचे भांडण हे ठरलेलेच असायचे. तो कामावरून घरी येताना दारू पिऊन आल्यावर तिला शिव्या देऊन मारहाण करणे हे त्याचे नित्याचेच झाले होते. तिला ही ते भांडण पाहिजेच असायचे कारण भांडणानंतर ती आपल्या माहेरी जात असायची.त्या दोघांना त्याच्या नातेवाईकांनी बऱ्याचवेळेला समजावून सांगून यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला होता. रमजान नातेवाईक सांगतील ते ऐकायला तयार होता पण सन्ना ही प्रियकर महंमदरझा याला सोडायाला तयार नव्हती. तिला त्या कामासाठी तोच पाहिजे होता.इकडे रमजान ही तिला सोडायला तयार नव्हता. त्याला आपला संसार टिकवायचा होता. मुलग्याकडे बघून तो गप्प राहत होता.याचा नेमका अर्थ सन्ना ही वेगळा काढत होती. तिला तो नकोच होता.म्हणून ती सारखी आपल्या माहेरी जात होती. ती माहेरी गेली की काही दिवसांनी रमजान हा तिचा राग काढून तिला बोलावयला येतो हे तिला चांगले माहित होते. म्हणून ती सारखी नाटकी करत होती.यामागे तिचा हेतू हा महंमदरझा याच्या बरोबर संबंध चालू ठेवणे एवढाच होता. ती तर त्याला उघड उघड गोकाक येथील आपल्या घरी बोलावित होती. मी कोणाला काही घाबरत नाही तू गोकाकला ये असे ती त्याला सांगत होती. पण तो काही तिकडे जात नसल्याने तीच त्याला भेटायला आणि त्याच्याबरोबर संबंध करायला बेळगावला येत होती. तिचे संबंध हे आता जगजाहिर झाल्याने तिला आपल्या संबंधात नवऱ्याचा अडसर वाटू लागला होता. तिला त्या कामात नवऱ्यापेक्षा प्रिकयर बरा वाटत असल्याने ती त्यालाच आपल्या अंगावर ओढून घेऊन मज्जा मारत होती. नवऱ्याचा तर ती किती दिवस मार सहन करणार होती.ती प्रियकराला माझ्याबरोबर लग्न कर म्हणून पाठलागलेली होती.पण तो मात्र तिला फक्त वापरत होता. तिची जवानी ओरडबाडून काढत होता. त्याला तिच्याबरोबर लग्न करायचे नव्हते. गेल्या महिन्यापूर्वी ती नेहमीप्रमाणे रमजानबरोबर भांडण करून माहेरी मुलाला घेऊन आली होती. काही दिवस तो तसाच थांबला होता. तिला नवरा नकोच होता. पण त्याला तर आपल्या संबंधातून बाजुला करायचे आहे म्हणून तिने एक मार्ग शोधला. तिने प्रियकर महंमदरझा याला बोलावून तुला जर मी पाहिजे असेन तर माझ्या नवऱ्याचा कायमचा काटा, त्याला आपल्या मार्गातून बाजुला कर असे सांगितले. त्याला ती वापरायाला पाहिजे असल्याने त्याने ही तिची ही गोष्ट मनावर घेतली. रमजान याला आपल्या वाटेतून बाजुला करण्यासाठी त्यांनी एक प्लॅन केला. २ डिसेंबर २०२२ ला तिने नवरा रमजान याला फोन करून सांगितले की, मी तुमच्या बरोबर गोकाकला यायला तयार आहे, तुम्ही मला बेळगावला न्यायला या. या मागे तिचा एक डाव होता.तो डाव रमजानला ओळखता आला नाही.बायकोने न्यायला या म्हटल्यावर तो त्या दिवशी आपल्या दुचाकी गाडीने गोकाकहून बेळगावला यायला निघाला. तिने त्याला येताना मक्कलकेरीहून तुम्मरगुद्दीमार्ग बेळगावला येण्याचा सल्ला दिला. त्याला ही हा मार्ग जवळचा वाटल्याने तो या मार्गाने यायला निघाला. तो कोणत्या मार्ग बेळगावला येणार आहे याची माहिती तिने अगोरदच प्रियकर महंमदरझा याला दिली. त्यामुळे महंमदरझा याने या कामासाठी अगोरदच आपला मित्र रोशन जमीर याला तयार केले होते. ते दोघे ही तो येण्याच्या वाटेवरील जंगलातील रस्त्यावर दबा धरून बसले होते. संध्याकाळी पाचच्या सुमारास रमजान हा तुम्मरगुद्दीच्या जवळ पोहचला होता.रस्ता तसा निर्मनुष्यच होता. रस्त्यावरती एकादे दुसरेच वाहन येत जात होते. वाटेवरील जंगलाच्या बाजुला महंमदरझा आणि रोशन हे दोघे दबा धरून बसले असताना रजमान हा त्यांना दुचाकीने येत असल्याचे दिसले. तो जवळ आल्यावर त्या दोघांनी रमजानला अडविले. रमजान आणि महंमदरझा हे दोघे ही तसे एकमेकांना ओळखत होते. काही तरी भानगड आहे हे रमजानाच्या लक्षात आले.तो दुचाकीवरून उतरून बाजुला झाला. मला का आडवले? याची तो विचारणा करीत होता. त्या दोघात सन्नावरून भांडण सुरू झाले.दोघेही एकमेकाच्या अंगावर जात होत. महंमदरझा याने रमजानला म्हटले की, तु सन्नाला सोडून दे, ती माझी प्रियेसी आहे. मी तिच्याशी लग्न करणार आहे. त्याने तसे म्हटल्यावर रमजानला त्याचा राग आला. तु माझ्या बायकोशी लग्न करणार आहेस काय म्हणत त्याच्या दोन कानाखाली लावली. त्यातच रोशन याने रमजान याला खाली पाडले. ते दोघे ही त्याला लाथाबुक्कांनी तुडवून मारत असतानाच त्या दोघांनीही बाजुला पडलेला एक मोठा दगड उचलला आणि रमजानच्या डोक्यात घातला. त्यासरशी रमजानचे डोके फुटून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. तेवढयावरच ते थांबले नाहीत तर त्यांनी तोच दगड पुन्हा उचलला आणि त्याच्या चेहऱ्यावर घातला. यात त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचे काम तमाम झाल्यावर त्या दोघांनी आपल्या बाईकवरून तेथून काढता पाय घेतला.तो पर्यत अंधार ही झाला होता. दुसऱ्या दिवशी तेथून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना एका तरूणाचा मृतदेह रस्त्याच्या कडेला पडला असल्याचे आणि त्याचा चेहरा आणि डोके दगडाने चेचले असल्याचे दिसून आल्यावर एका दक्ष नागरिकाने या घटनेची माहिती मरिहाळ पोलीसांना दिली. मरिहाळ पोलीस स्टेशनचे पो.निरी महांतेश बसापुरे यानी तातडीने घटनास्थळी भेट देत घटनेची पाहणी केली. मयत तरूणाचा चेहरा दगडाने ठेचलेला असल्याने तो पुर्ण ओळखता येत नव्हता.बाजुलाच त्याची गाडी पडली होती. त्या गाडीच्या नंबरवरून मयत तरूण हा रमजान बशीरअहमंद बेन्नी असल्याची ओळख पोलीसांना पटली.त्यांनी या घटनेची माहिती त्याच्या घरच्या लोकांना देऊन त्यांना घटनास्थळी बोलावून घेतले. त्यांनी ही मयताची ओळख पटविल्यावर पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह गोकाक येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. रमजान याचा खून कुणी आणि कोणत्या कारणासाठी केला याचा तपास करीत असताना पोलीसाना रमजान याच्या पत्नीचे महमंदरझा इनामदार याच्याबरोबर असल्याची माहिती मिळाली.त्यांनी तिला ताब्यात घेऊन तिच्याकडे या घटनेची चौकशी करीत असताना ती पोलीसांना उडवाउडवीची उत्तरे देत होती. त्यातच रमजान याच्या मोबाईलवरती तिचाच शेवटचा कॉल आला होता आणि घटनेच्या वेळी तिने महंमदरझा याला ही फोन केल्याची माहिती मिळाली. यावरून महिला पोलीसांनी तिला बोलते केले असता तिने आपल्या गुन्हयाची कबुली देऊन आपल्याच सांगण्यावरून प्रियकर महंमदरझा इनामदार आणि त्याचा मित्र रोशन जमीर यांनी नवरा रमजान सन्ना याची गेम केल्याचे सांगितले. तिच्या सांगण्यावरून पोलीसांनी या घटनेतील महंमदरझा आणि रोशन जमीर यांना ही ताब्यात घेतले. त्यांनी ही आपला गुन्हा कबुल केला. या तिघांनी आपला गुन्हा कबुल केल्यावर मयत रमजान सन्ना याच्या भावाने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी रमजान बशीर अहमंद बेन्नी (वय २८) याच्या खून प्रकरणी त्याची पत्नी सन्ना बेन्नी (वय २५) तिचा प्रियकर महंमदरझा नुरमहमंद इनामदार (वय २५) रा.सातवा क्रॉस रुक्मिणी नगर बेळगावी आणि त्याचा मित्र रोशन जमीर फिरोज शेख (वय २२) रा.आसदखान सोसायटी बेळगावी याच्या विरोधात आयपीसी. कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्याची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेली मोटार सायकल आणि रक्ताने माखलेले कपडे जप्त केले. या घटनेचा पुढील तपास मरिहाळ पोलीस स्टेशनचे पो.निरी. महातेंश बसापुरे याच्या मार्गदर्शना खाली मरिहाळ पोलीस करीत आहेत. त्या संबंधात महिला वाहवत गेली की ती कुठल्या थराला जावून विचार करते याचीच प्रचिती या घटनेवरून दिसून येते.

क्राईम संध्या | सोमवार दि. १२ डिसेंबर २०२२ ते रविवार दि. १८ डिसेंबर २०२२ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ३

# शहरात दिवसाढवळ्या घरफोडी करणारी टोळी जेरबंद!



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

दिवसा घरफोडी करणाऱ्या टोळीचा फर्दाफाश करण्यात सोलापूर ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आलेली आहे. या टोळीतील तिघांना अटक करण्यात आलेली आहे. इतर तीन आरोपी फरार आहेत अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून सात घरपोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यात आले असून त्यांच्याकडून २ लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अजिनाथ चिंतामण काळे (वय २७), सुरेश उर्फ तिरशा चिंतामण काळे (वय ४५, दोघेही रा. कडा ता. आष्टी, जि. बीड) आणि जगदीश पेरू काळे (वय ३०, रा. तळेवस्ती, ता. कडा, जि. बीड) अशी अटक करण्यात आलेल्या संशयीत आरोपींची नावे आहेत. या आरोपींकडून करकंब पोलीस ठाण्यातील एक, मोहोळ पोलीस ठाण्यातील चार, करमाळा पोलीस ठाण्यातील दोन गुन्हे उघडकीस आले. करकंब पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मेंढापूर गावात भर दिवसा चोरट्याने घरफोडी करून १४ लाख १० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरून नेला होता याबाबत करकंब पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या गुन्ह्याचा तसेच इतर घरफोड्याच्या अनुषंगाने संशयित आरोपींचा सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांकडून शोध सुरू असतानाच खबऱ्यांमार्फत मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी इंगळगी तालुका दक्षिण सोलापूर येथून अजिनाथ काळे व सुरेश काळे या दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली. यावेळी त्यांनी आपल्या इतर सहकाऱ्यांच्या मदतीने सोलापूर जिल्ह्यातील करमाळा, मोहोळ, करकंब परिसरातील गावांमध्ये दिवसाढवळ्या घरपोडी केल्याचे कबूल केले त्यानुसार पोलिसांनी जगदीश काळे यास बीड जिल्ह्यातून ताब्यात घेतले. या टोळीतील इतर तीन आरोपी हे अद्याप फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत पोलिसांनी अटक केलेल्या तिघांकडून करकंब पोलीस ठाण्यात दाखल केले असलेल्या गुन्ह्यातील २ लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल व गुन्ह्यात वापरलेले दुचाकी वाहन जप्त केले.

या आंतरजिल्हा टोळीतील सदस्य हे बीड जिल्ह्यातील असून हे सर्वजण ऊसतोड कामगार बनवून सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात येत होते ऊस तोडी दरम्यान ते घरपोडी करण्यासंदर्भात रेकी रेखायचे रेकी करायचे ऊस तोडीचा हंगाम संपल्यावर परत गावाकडे जाऊन दुचाकीवरून सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात येत असत पूर्वी रेखी करून ठेवलेली घरे तसेच ग्रामीण भागातील निर्जन बंदिस्त असलेली घरे शोधून दिवसा ढवळ्या म्हणजे सकाळी ११ ते दुपारी ३ या कालावधीतच घरफोडी करून परत पुन्हा दुचाकीवरून गावाकडे जात असत. या टोळीतील सर्व सदस्य हे गुन्हेगारी पार्श्वभूमीचे आहेत त्यांच्यावर अहमदनगर, बीड, उस्मानाबाद जिल्ह्यात दरोडा जबरी चोरी घरफोडी यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत आजिनाथ चिंतामण काळे व सुरेश ऊर्फ तिरशा चिंतामण काळे हे दोघे सख्खे भाऊ आहेत तर जगदीश काळे हा त्यांचा काका आहे सुरेश उर्फ तिरशा चिंतामण काळे हा आरोपी हा डिसेंबर २००१ मध्ये कोठेवाडी जि. अहमदनगर येथील बहुचर्चित बलात्कारासह दरोडाच्या गुन्ह्यातील आरोपी असून तो मागील वर्षी या गुन्ह्यात २१ वर्षे शिक्षा भोगून आलेला आह. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पोरे, पोलीस उपनिरीक्षक राजेश गायकवाड, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक बिराजी पारेकर, श्रीकांत गायकवाड, हवालदार सलीम बागवान, आबासाहेब मुंडे, हरिदास पांढरे, विजयकुमार भरले, पोलीस नाईक रवी माने, समर्थ गाजरे, विनायक घोरपडे, दिलीप थोरात यांनी केली आहे.

## अहमदपूर येथे शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन!

अहमदपूर : अहमदपूर येथे लोकनेते खासदार शरदचंद्रजी पवार, माजी मंत्री बाळासाहेब जाधव व आमदार बाबासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त १२ डिसेंबर रोजी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सायंकाळी पाच वाजता 'शरदाचे चांदणे' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आयोजित केलेल्या कार्यक्रमांमध्ये 'निमंत्रितांचे कवी संमेलन' या कार्यक्रमात अध्यक्ष कवी एन.डी राठोड, सहभागी कवी हास्य सम्राट रमेश गिरी नांदेड, अता हैद्राबादी, खटपट भैसवी (तेलंगणा), बजरंग पारिख नांदेड, विद्रोही कवी राजेंद्र कांबळे, बालाजी मुंडे प्रा. अनिल चवळे, प्रा. डॉ. मारुती कसाब, वैजनाथ गीते, रंजना गायकवाड, वर्षा माळी, मीना तौर, अल्तमश तांबोळी, यांचा सहभाग असणार आहे. तसेच 'स्वर बहार' या कार्यक्रमांमध्ये जुन्या नव्या गीतांचा बहरदार मैफील होणार असून यामध्ये प्रा. विजय खानापुरे, संगीता सुतार, उत्तम वाडेकर, मो आरेफ मुल्ला, शेख माहीन आदींचा सहभाग असणार आहे. व तसेच या बहारदार कार्यक्रमांमध्ये 'ढोलकी झाली बोलकी' या कार्यक्रमात ढोलकी सम्राट, सोलो ढोलकी वादक राजू सोनकांबळे यांचेही कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले असून या बहारदार कार्यक्रमाचा अहमदपूर व परिसरातील नागरिकांनी या कार्यक्रमाचा अवश्य लाभ घेण्याचे संयोजन समितीच्या वतीने आव्हान करण्यात आले आहे.


# आम आदमी पार्टीच्या कार्यकर्त्यांचे जल्लोष!



**लातूर/प्रतिनिधी**

दिल्लीतील (एमसीडी) निवडणुकीचे निकाल बुधवार दिनांक सात डिसेंबर २०२२ रोजी आले. आम आदमी पार्टीने पहिल्यांदाच १३४ जागा जिंकत बहुमत मिळविले आहे. लातूर शहरातील आप कार्यकर्त्यांनी शहरातील गांधी चौकसह विविध भागांमध्ये जल्लोष साजरा करत आनंद व्यक्त केला. आम आदमी पार्टी ला दिल्लीतील एमसीडी मध्ये भाजपाला १०४ जागेवर रोखण्यात यश आले आहे. तर भ्रष्टाचार का एक ही काल केजरीवाल केजरीवाल, आम आदमी पार्टीचा विजय असो, भारत माता की जय, भ्रष्टाचार पे चलेगा झाडू, अशा अनेक घोषणा आपच्या कार्यकर्त्यांनी दिल्या तसेच फटाके फोडून व पेढे वाटून आनंद साजरा केला. तर यावेळी जिल्हाध्यक्ष प्रताप भोसले, मराठवाडा सोशल मीडिया अध्यक्ष हरी गोटेकर, जिल्हा सचिव सय्यद सैदोदिन, लातूर जिल्हा उपाध्यक्ष भागवत कारंडे, विजय आचार्य, लातूर शहर अध्यक्ष सिद्धेश काळे लातूर, शहर सचिव सुमित दीक्षित, उपाध्यक्ष सचिन औरंगे, युवा जिल्हाध्यक्ष श्याम माने, उपाध्यक्ष आकाश मोठेराव. साहिल तांबोळी, अजीम पठाण. विक्रांत शंके शिवलिंग गुजर सय्यद मुस्तफा आदीच सह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते अशी माहिती बुधवारी रात्री १० वाजता एका प्रसिद्धी पत्रकात देण्यात आली आहे.

# देवणी, वलांडी आणि देवणी खुर्द येथे ६६व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन!



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी शहरासह वलांडी आणि देवणी खुर्द येथे विविध क्षेत्रातील मान्यवर व ग्रामस्थांच्या वतीने ६६व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मंगळवार दि.६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून अभिवादन करण्यात आले. देवणी तालुक्यातील देवणी खु येथे देवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संरपच यशंवत कांबळे, रमेश कांबळे चेअरमन रतन गरड, अनिल कांबळे, पत्रकार लक्ष्मण रणदिवे, दैवशाला कांबळे, सरोजा गायकवाड यांच्यासह आदी उपस्थित होते. वलांडी मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी देवणी पंचायत समितीचे माजी उपसभापती तुकाराम पाटील, माजी सरपंच राम भंडारे, काँग्रेसचे अनुसूचित जाती जमाती सेलचे देवणी तालुकाध्यक्ष बालाजी सोनकवडे, पत्रकार अक्रम शेख, विलास वाघमारे, नितीन वाघमारे यांच्यासह आदींची उपस्थिती होती. देवणी शहरातील समाज मंदिर येथे प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी नगराध्यक्षा किर्ती घोरपडे, नगरसेवक अनिल इंगोले, वैजनाथ लुल्ले, पत्रकार रमेश कोतवाल, अमरदीप बोरे अनिल कांबळे, चंद्रकांत मोठेराव, देवीदास पतंगे यांच्यासह आदी उपस्थित होते.

## थोडक्यात वृत्तांत

### निरोगी जीवनासाठी व्यसनापासून दूर राहा!

लातूर : कोणत्याही प्रकारचे व्यसन हे शरीरासाठी हानिकारक असते. त्यामुळे सदृढ व निरोगी जीवनासाठी व्यसनापासून दूर राहणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले. जिल्हा परिषदेचा समाज कल्याण विभाग व जीवनरेखा प्रतिष्ठान (एकात्मीक व्यसनमुक्ती केंद्र) यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आयोजित व्यसनमुक्ती जनजागृती चित्रप्रदर्शनीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, मराठवाडा मुक्तिसंग्राम अमृत महोत्सव, समता पर्व, नशामुक्त भारत अभियान व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, सहाय्यक आयुक्त शिवकांत चिकुर्ते, समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य गवळी उपस्थित होते. तंबाखू, मद्यपान व धुम्रपान विरोधी चित्रांचा समावेश असलेल्या चित्रप्रदर्शनात महाविद्यालयातील युवक- युवती व शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवीला. युवक-युवतींना व्यसनापासून दूर राहावे. तसेच सक्षम समाज घडविण्यासाठी नशामुक्त भारत अभियानामध्ये पुढाकार घेवून कार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी यावेळी केले. नाईकवाडी यांनी प्रास्ताविकात कार्यक्रमाचा हेतू स्पष्ट केला. चित्रप्रदर्शन यशस्वी करण्यासाठी समाज कल्याण विभागातील अधिकारी, कर्मचारी, तसेच जीवन रेखा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विजयकुमार यादव आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

### विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

लातूर : लातूर जिल्हा क्रीडा आधिकारी कार्यालयाच्या वतीने क्रीडा संकुल येथे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाचा बालाजी पवळे या कुस्तीपटूने १७ वर्षाखालील वयोगटातील ६० किलो वजन गटात प्रथम क्रमांकाचे यश संपादन केले. त्याची विभागीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याच विद्यालयाचा विद्यार्थी शेवाळे यांने जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेतद्वितीय क्रमांकाचे यश मिळविले.१४ वर्षे वयोगटाखालील ३५ किलो वजन गटात हरी पवळे, विरेन घुले या खेळाडूंनी द्वितीय क्रमांकाचे यश प्राप्त केले.या सर्व यशस्वी खेळाडूंना क्रीडा शिक्षक गुरूनाथ झुंजारे व प्रयागराज गरूड यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व विजयी विद्यार्थ्यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे डॉ.सुरेन्द्र अलूरकर,उपाध्यक्ष जितेश चापसी, कार्यवाह हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, संजय गुरव, नितीन शेटे,स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष धनंजय कुलकर्णी (तुंगीकर),शालेय समिती अध्यक्ष शैलेश कुलकर्णी, मुख्याध्यापक प्रदीप कुलकर्णी, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक दिलीप चव्हाण,संदीप देशमुख,बबन गायकवाड, अंजली निर्मळे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

### शारदा स्कूलमध्ये महापरिनिर्वाणदिनी अभिवादन!

लातूर : येथील शारदा सेमी इंग्लिश स्कूलमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण पुरी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित शिक्षक व विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रा. रोहित जाधव, मानसी पाटील, सूरज गड्डिमे, एकनाथ जाधव, ओमप्रकाश लवटे, दर्शना देशमुख, माधुरी पाटील, वर्षा कांबळे, सुषमा मुंडे, रेणुका समुद्रे, ऐश्र्वर्या बागल, गीतांजली गिरी, प्रांजली पाटील, प्रियल गोखले, साधना भेटे यांसह शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अश्विनी पवार यांनी केले. प्रास्ताविक अनघा पाटील यांनी केले. उपस्थितांचे आभार उषा गुदडे यांनी मानले.

### विजयकुमार भद्रशेट्टे यांचे निधन



देवणी : येथील विजयकुमार शिवराजआप्पा भद्रशेट्टे वय ४८ वर्षे यांचे पुणे येथील खाजगी रुग्णालयात गुरुवारी (दि.१) सकाळी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी (दि. २) रोजी सकाळी ९ वाजता त्यांच्या शेतामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे. येथील व्यापारी सोमनाथ भद्रशेट्टे यांचे ते छोटे बंधू होत.

# जबरी चोरी करणाऱ्यास स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

जबरी चोरी व दरोडा घालणाऱ्याला सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने मुस्ती येथून अटक करण्यात आली. २० नोव्हेंबर २०२२ रोजी आम्ही स्थानिक गुन्हे शाखेच्या पथका सोबत पाहिजे असलेल्या आरोपी यांचे शोध घेत असताना, पोहेकॉ/हरिदास पांढरे यांना गोपनीय बातमी मिळाली की, मंद्रुप पोलीस ठाणे गुरंन ३३२/2020 भादंवि क ३९५, ३९७ या दरोडयाच्या गुन्हयामधील पाहिजे आरोपीचे नाव राहुल चंद्राकांत भोसले रा. मुस्ती ता. दक्षिण सोलापूर हा मुस्ती गांवातील त्याचे राहते घरामध्ये बसला आहे. सदर गोपनीय बातमीची खात्री करणे कामी आम्ही सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकासह पाहिजे आरोपी याचे घरी गेलो असता, पाहिजे आरोपी राहूल चंद्रकांत भोसले हा त्याचे मुस्ती येथील घराच्या अंगणात बसलेला दिसला, सदर पाहिजे आरोपीस सापळा रचुन ताब्यात घेण्यात आले आहे. नमुद पाहिजे आरोपी हा मंद्रुप पोलीस



ठाणेचे पाहिजे आरोपी अभिलेखावर नोंद आहे. नमुद आरोपी याच्यावर यापुर्वी दरोडा व जबरी चोरीचे गुन्हे दाखल आहेत. पाहिजे आरोपी राहुल चंद्रकांत भोसले रा. मुस्ती ता. दक्षिण सोलापूर यास पुढील कार्यवाहीकरीता मंद्रुप पोलीस ठाणेस जमा करण्यात आले आहे. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक, धनंजय पोरे, पोउनि/राजेश गायकवाड, सफौ/बिराजी पारेकर, श्रीकांत गायकवाड, पोहेकॉ/सलीम बागवान, हरिदास पांढरे, आबा मुंढे, विजयकुमार भरले, मपोना/अनिसा पटेल, पोना/रवि माने, चापोकॉ/दिलीप थोरात यांनी बजावली आहे.

## 'बोंबळी बुद्रुक' या गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत द्या, अन्यथा ग्रामस्थांचा निवडणुकीवर बहिष्कार

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील बोंबळी बुद्रुक या गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत द्या अन्यथा कर्नाटक राज्यात सामील होणार म्हणून या प्रमुख मागणीसाठी ग्रामस्थांनी होऊ घातलेल्या ग्रामपंचायत निवडणूकीवर बहिष्कार टाकल्याचे निवेदन जिल्हा प्रशासनाला दिले आहे. याची दखल घेत जिल्हा प्रशासनाच्या वतीने देवणी तहसीलचे नायब तहसीलदार विलास तरंगे यांनी बुधवार दि.७ डिसेंबर रोजी बोंबळी बुद्रुक येथे भेट देऊन ग्रामस्थांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी व्हावे अशी विनंती केली आहे. बोंबळी बुद्रुक व बोंबळी खुर्द हे देवणी तालुक्यातील महाराष्ट्र-कर्नाटक सिमेवर असून दोन्ही बोंबळीची ग्रुप ग्रामपंचायत आहे. मात्र बोंबळी बुद्रुक या गावाला स्वतंत्र ग्रामपंचायत द्या अन्यथा बोंबळी बुद्रुक हे गाव कर्नाटक राज्यात सामील होणार व आगामी ग्रामपंचायत निवडणूकीवर बहिष्कार टाकणार असल्याचा इशारा ग्रामस्थांच्या वतीने जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनातून देण्यात आला आहे.

**आरोग्य विभाग, जिल्हा परिषद पालघर**

**११६, पहिला मजला, जिल्हा परिषद इमारत, कोळगाव, पालघर-बोईसर रोड ता.जि. पालघर**

**जाहीर निविदा**

**निविदा सूचना : ई-निविदा क्र.१ (२०२२-२३)**

पालघर जिल्हा परिषद अंतर्गत आरोग्यमध्ये मानधन तत्त्वावर करार पद्धतीने विविध पदांकरीता काम करण्यासाठी नोंदणीकृत संस्थांकडून जाहीर ई-निविदा मागविण्यात येत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर हे आरोग्य विभागामध्ये आरोग्य संवर्गीय कर्मचाऱ्यांची कार्यालयीन व क्षेत्रीय कामकाजाकरीता मानधन तत्वावर करार पद्धतीने नोंदणीकृत संस्थांकडून (बाह्यस्त्रोताकडून) ई-निविदेद्वारे मनुष्यबळ पुरवठ्याची निविदा मागवित आहेत. सदर निविदेबाबत विस्तृत माहिती http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

वरील नमुद मनुष्यबळ पुरवठ्याकरीता निविदा दि. ०७/१२/२०२२ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून दिनांक २७/१२/२०२२ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत Online Download व Online Submissio पद्धतीने स्विकारण्यात येतील व दिनांक २९/१२/२०२२ रोजी (शक्य झाल्यास) दुपारी ०३.०० वाजता उघडण्यात येतील.

यापुढील शुद्धीपत्रक अथवा इतर माहिती ही http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

स्वाक्षरी/-
**डॉ. दयानंद सुर्यवंशी**
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, पालघर

स्वाक्षरी/-
**बी. एच. पालवे (भा.प्र.से.)**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, पालघर

# नागराळ येथे सेवानिवृत्त फौजदारच्या डोक्यात विटने मारून डोके फोडले; दोघांविरुध्द गुन्हा दाखल

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील नागराळ येथे हात उसने दिलेले ५० हजार रुपये मागण्यांसाठी गेलेल्या दावणगाव येथील रहिवासी असलेले सेवानिवृत्त फौजदारांच्या डोक्यात विटने मारून जखमी केले. ही घटना गुरुवार सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत देवणी पोलीसांच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, गुरुवारी सकाळी साडे सात वाजण्याच्या सुमारास फिर्यादी उमाजी शेषेराव मुळे व त्यांचा मुलगा वैभव उमाजी मुळे दोघेही राहणार दावणगाव यांचे मयत वडिलांनी तीन वर्षापूर्वी नागराळ येथील त्यांच्या मित्राला त्याच्या मुलाच्या शिक्षणासाठी हात उसने म्हणून ५० हजार रुपये दिले होते. या दरम्यान फिर्यादीच्या वडीलांचे निधन झाले. फिर्यादीच्या वडीलांची हात उसने घेतलेली रक्कम परत देण्यास टाळाटाळ झाल्याने. फिर्यादी व त्यांचा मुलगा गुरुवारी सकाळी नागराळ येथे संदेश हरिश्चंद्र चामले यांच्या घरासमोर जाऊन पैसे परत द्या म्हणून विचारत असताना चामले यांचा मुलगा गुणवंत चामले हा पाठीमागून हातात विट घेऊन तुम्ही पैसे मागण्यांसाठी येथे का आलात म्हणून डोक्यात विटने मारून जखमी केले. या प्रकरणी उमाजी मुळे राहणार दावणगाव यांच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजि.नं. २८५/२०२२ कलम ३२७,३२४, ३२३,५०६, ३४ भादवी प्रमाणे संदेश हरिश्चंद्र चामले व गुणवंत संदेश चामले दोघेही राहणार नागराळ यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस हेडकॉंस्टेबल एस.जी. कोंडामंगले हे करीत आहेत.

# 'आपडी अंधभक्ती आपडो गुजरात'

लोकशाहीत मतदार राजा हा जागरूक असतो. त्यामुळे त्याला स्वतःचे आणि देशाचे भले बुरे समजते. पण २०१४ पासून या देशात अंधभक्तीची एक विचित्र लाट आली आहे. अशावेळी एखादा पक्ष किंवा त्या पक्षाचा नेता याना देवपण देण्याची प्रथा सुरू झाली आहे. त्यामुळे त्याच्या चुकांकडे दुर्लक्ष करून त्याच व्यक्ती महात्म्य याचाच विचार करून अशा माणसाची पूजा केली जाते. आणि अशा माणसाची पूजा करणाऱ्या अंधभक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. काही दिवसांपूर्वी उत्तर प्रदेश आणि आता गुजरातमध्ये हेच बघायला मिळाले. गुजरातच्या १८२ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपला १५६ जागा मिळाल्या. त्यामुळे विधानसभेत विरोधी पक्षाचे केवळ २६ आमदार असतील. आता ह्या २६ लोकांचे १५६ लोकांच्या सरकार समोर काय चालणार? त्यामुळे गुजरातमध्ये पुढील ५ वर्षांमध्ये कशीही मनमानी करायला सरकार मोकळे आहे. लोकशाहीसाठी हा सगळा प्रकार घातक आहे. पण जोवर या देशात अंधभक्त आहेत तोवर भाजपला कुणाचीही भीती नाही. गुजरातमध्ये विधानसभेच्या १५६ जागा सहज जिंकण्यासारखे भाजपने तिथे काय केले? आज गुजरातमध्ये भाजपा २७ वर्षे सत्तेत आहे, पण या २७ वर्षात तिथल्या दलीत अल्पसंख्यांक समाजासाठी गुजरात सरकारने काय केले आहे ते एकदा जाहीर करावे? गुजरातमध्ये २००२ साली जी जातीय दंगल उसळली होती त्याच्या जखमा आजही गुजरात मधील अल्पसंख्यांकांच्या हृदयावर कायम आहेत. त्या दंगलीत ज्यांनी सर्वस्व गमावले. त्यातील कित्येकांचे आज २५ वर्षांच्या नंतरही पुनर्वसन झालेले नाही. उलट आता तर हिंदुत्वाची आग अधिक भडकल्याने गुजरात मधील दलीत अल्पसंख्याक जीव मुठीत धरून जगतोय. कारण कधी काय होईल याचा नेम नाही. याला लोकशाही म्हणायचे का? गुजरातमध्ये आजही अनेक भागात चांगल्या नागरी सुविधा नाहीत. खास करून दलीत अल्पसंख्याक समाजातील लोकांचे वास्तव्य आहे तिथे फारशा सेवा सुविधा नाहीत. त्यामुळे गुजरातमध्ये अनेक विकास कामे झाल्याचा जो धींडोरा पिटला जात आहे, ते केवळ अर्धसत्य आहे. तिथले वास्तव हेच आहे की आजही गुजरातच्या अल्पसंख्यांक आणि आदिवासी जनतेचे वास्तव्य असलेल्या भागात पुरेशा सोई सुविधा नाही. प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींनी काही भागातील लोकांची मते जाणून घेतली तेंव्हा तिथल्या लोकांनी हेच वास्तव सांगितले. त्यामुळे गुजरात मधील भाजपचा विजय ही तिथल्या सरकारच्या विकास कामाची पोचपावती नव्हती तर मोदींच्या महत्म्यामुळे हा विजय मिळाला. मोदी हेच खरे हिंदुत्ववादी नेते आहेत असे इथल्या हिंदूंना वाटते. त्यामुळे इथले सर्व हिंदू एकजुटीने मोदींच्या पाठीशी उभे राहिले अन्यथा १५६ जागा मिळवण्या इतपत गेल्या ५ वर्षात भाजप सरकारने कोणतेही मोठे काम केलेले नाही. मोदी १८ तास काम करतात असे सांगितले जाते. मात्र जे लोक असा दावा करतात त्यांनी एक सांगावे की पंतप्रधान पदावरची व्यक्ती ५० किमीचा रोड शो कसा काय करू शकते यात त्यांचे किती तास वाया गेले याचा का नाही हिशोब मागितला जात? याचे कारण लोक अंधभक्त झाले आहेत, त्यांनी मोदींना देवघरातील देव्हाऱ्यात बसवले आहे. त्यामुळे त्यांच्या सरकारने किती जरी चुका केल्या तरी त्या अंधभक्तांना दिसत नाहीत. नोटबंदीमध्ये गुजरात मधील लोकांचेही नुकसान झाले. मोदी सरकारने शेतकरी विरोधी विधेयके मंजूर केली त्यात गुजरात मधील शेतकऱ्यांचे सुद्धा नुकसान झाले होते. तरीही लोक मोदींना देव मानून त्यांच्या मागे फरफटत जात आहे आणि हीच अंधभक्ती कधीना कधी या देशातील जनतेला भारी पडणार आहे. गुजरात सारख्या राज्यात भलेही जातीयवादी अंधभक्तांची संख्या वाढत असली तरी याच गुजरातमध्ये काँग्रेसने अनेक वर्ष राज्य केले हे सुद्धा विसरून चालणार नाही. अगदी जीनाभाई दर्जी पासून शंकर सिंग वाघेला यांच्यापर्यंत अनेकांनी यशस्वीपणे सरकार चालवले आणि संघाचे हिंदुत्व हे भाजपच्या हिंदुत्व पेक्षा अधिक कडवट असतानाही गुजरातमध्ये जनसंघाच्या लोकांना फारसे कुणी विचारत नव्हते. कारण त्यावेळच्या हिंदुत्वाला राजकीय चेहरा नव्हता. मात्र मोदींच्या रूपाने हिंदुत्वाला एक शाश्वत चेहरा मिळाला आणि गूजरतमध्ये भाजपने घट्ट पाळेमुळे रोवली. पण १८२ पैकी १५६ जागा जिंकणे म्हणजे खूपच झाले. त्यातच विरोधी पक्षांच्या मताची आप आणि काँग्रेसमध्ये विभागणी झाली त्याचा फायदा अर्थातच भाजपला झाला. कारण काँग्रेसच्या ५० जागा कमी झाल्या. आपनेही ५ जागा जिंकून खाते उघडले, तर काँग्रेस ७७ वरून १७ वर आली. आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की काँग्रेसला विरोधी पक्ष नेतेपद सुद्धा मिळणार नाही. कारण त्यासाठी १८ जागांची आवशकता होती आणि काँग्रेसला अवघ्या १७ जागा मिळाल्या, जर आप आणि काँग्रेस भाजपच्या विरोधात एकत्र लढले असते तर भाजपला येवढ्या जागा मिळाल्या नसत्या. पण आता काय आपडे अंधभक्त, आपडो मोदी अने आपडो गुजरात बद्धा सारू छे!

# तुम्ही ब्ल्युटूथ पेअर करताना, देताय हॅकर्सना आमंत्रण!

**दिशायन**

विज्ञान, माहिती - तंत्रज्ञानात जसजशी प्रगती होत आहे, तसतशी आपल्या राहणीमानात बदल होत आहे. आपण दिवसेंदिवस तंत्रज्ञान अधिकाधिक प्रगत होत चाललो आहोत, आपल्या आजूबाजूच्या भौतिक वस्तूही स्मार्ट होत चालल्या आहेत. स्मार्ट वॉच, स्मार्ट टुथब्रथ, स्मार्ट बॅग, स्मार्ट कॅप, स्मार्ट ग्लेअर्स, स्मार्ट इयरफोन्स अर्थात एअरबड्स, स्मार्ट पेन इत्यादी अनेक आपल्या गरजेच्या ते फॅशनच्या सर्वच गोष्टींमध्ये तंत्रज्ञान सामील होऊन त्या स्मार्ट होत चालल्या आहेत. मंडळी या स्मार्ट वस्तूंमध्ये बहुतांशवेळा ब्ल्यूटुथ कनेक्ट करावे लागते. ही उपकरणे आपण आपल्या मोबाईल, लॅपटॉप, टॅब किंवा पॅडला ब्ल्यूटुथद्वारे कनेक्ट करून त्या वापरतो किंवा त्यातील माहिती, अपडेट्स जाणून घेतो. याच ब्ल्यूटुथ कनेक्टेड उपकरणांना हॅक करून आपल्या लॅपटॉप, मोबाईलमधील खाजगी, संवेदनशील माहिती घेऊन चोरण्यात येत आहे.

प्राथमिकरीत्या ब्ल्यूटुथच्या वापराने चालणाऱ्या उपकरणांना हॅक करणाऱ्या प्रकाराला ब्लूबगिंग असे संबोधतात. हे हॅकिंग तंत्र जेव्हा कोणत्याही डिव्हाइसचा ब्लूटूथ डिस्कव्हरी मोड'वर असतो, तेव्हा सायबर हल्लेखोर ब्लूबगिंग' तंत्राद्वारे उपकरण हॅक करतात.ब्लूबगिंगच्या माध्यमातून सायबर चोरटे फोन कॉल, टेक्स्ट मेसेज, वापरकर्त्याचा कॉल दुसऱ्या नंबरवर वळवणे यासह इतरही जतन केलेली माहिती चोरू शकतात. पूर्वी या तंत्राच्या वापराने केवळ लॅपटॉप हॅक केला जात होता, आता भामटे हेच तंत्र वापरुन इतर नवी ब्ल्यूट्युथ उपकरणे हॅक करत आहेत.

आपल्या मोबाईल किंवा लॅपटॉला कोणतेही स्मार्ट उपकरण जोडत असताना ब्ल्यूटुथ सुरु करतो, त्यावेळी साधारण १० मीटरच्या अंतरावरुन हॅकर्स सहजरीत्या हॅक करतात. यादरम्यान हॅकर्स आपल्या डिव्हाईसमध्ये मालवेअर इन्स्टॉल करतात. याद्वारे नियोजनबद्ध आपल्या सोशल मिडिया प्लॅटफॉर्मचा पासवर्ड, बँक खात्यांचे पासवर्ड, सेव्ह असलेले फोन नंबर, मेल, पर्सनल मेसेजेस, फोटोज आणि इतर सेव्ह डेटा चोरला जातो. पासवर्ड मिळवण्याच्या पद्धतीला ब्रूट-फोर्स अॅटॅक' असे म्हणतात.

आपले डिव्हाईस हॅक झाल्यास, त्यातील माहिती लगेच हॅकर्सपर्यंत पोहोचत नाही. इन्स्टॉल केलेल्या मालवेअरद्वारे तात्काळ आपल्या माहितीचा प्रवेशद्वार उघडत नाही, त्यासाठी अनेक प्रक्रिया असतात. समजा, त्या प्रक्रिया पूर्ण झाल्या तर तुमच्या नंबरवरुन कोणालाही मेसेज, कॉल जाऊ शकतो तर मेलदआयडीवरुन मेल, सोशल मिडियावरुन पोस्ट किंवा पर्सनल डिएमवरुन धमकी, पैसे उकळणारा संदेश त्याचबरोबर मालवेअर लिंक्स आदी जाऊ शकतात. मुख्य म्हणजे तुमच्या बँक अकाऊंटमधले पैसे ट्रान्सफर होऊ शकतात.

आपले डिव्हाईस हॅक होऊ नये आणि त्यातील माहिती लीक होऊ नये यासाठी काय काळजी घेतली पाहिजे -

सार्वजनिक ठिकाणी ब्ल्युटूथ वापरताना सावधान राहिले पाहिजे. आजकाल वर्क फ्रॉम होम, फ्रिलान्सिग, स्टार्टअप्स आदी कामे करणारे व्यक्ती कॅफे, बुटीक रेस्टॉरंट्समध्ये कामासाठी बसतात. अशाठिकाणी हॅकर्स अधिक सुळसुळाट असतो. कारण, त्या ठिकाणी आणखी कोणत्या प्रकारचे लोक बसले आहेत याची खात्री देता येत नाही, तेव्हा तेथे उपकरण पेअर करताना नीट वाचून करा, अन्यथा तुम्ही स्वतःहूनच तुमचे डिव्हाईस दुसऱ्याच्या ताब्यात द्याल. ब्ल्यूटुथ उपकरण आपल्या डिव्हाईसला जोडलेले नसेल किंवा ते उपकरण वापरुन झाले असेल तर लगेचच ब्ल्यूटुथ बंद करावे किंवा अनपेअर करावे. जेणेकरून कोणी मालवेअर इन्स्टॉल केला तरी त्याची प्रक्रिया ते पूर्ण करू शकणार नाहीत, म्हणजे तुमचा डेटा सुरक्षित राहिल. तुम्ही तुमच्या डिव्हाईसमधील ब्ल्युटूथ सेटींग्जमध्ये 'नॉट डिस्कव्हरेबल' असा मोड ऑन करून ठेवल्यास सायबर गुन्हेगारापर्यत तुमचे डिव्हाईस किंवा ब्ल्युटूथ उपकरण पोहोचणारच नाही. तसेच तुम्ही आपल्या डिव्हाईसच्या माय अॅक्टीव्हिटी सेक्शनमध्ये जाऊन तुमची अॅक्टीव्हिटी तपासा त्यात तुम्ही न केलेल्या गोष्टी दाखवल्या जात असतील तर त्वरीत सावधान व्हा.

# आधुनिक महाराष्ट्राचा विकासमार्ग : समृद्धी महामार्ग

कोणत्याही भागाचा विकास हा स्थानिक ठिकाणी दळण-वळणाची साधने किती चांगल्या दर्जाची आहेत, यावर ठरतो. त्यामुळे राज्याच्या विकासासाठी रस्ते विकासाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. राज्यातील रस्त्यांचे जाळे विकसित झाले, तर आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे, हे ओळखून महाराष्ट्र शासनाच्या अथक प्रयत्नानंतर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली ११ डिसेंबर रोजी 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गा'चे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होत आहे...यानिमित्त हा विशेष लेख.

'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गा'च्या पहिल्या टप्प्यातील नागपूर ते शिर्डी (कोकमठाण) या ५२० किलोमीटर रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. तर उर्वरित शिर्डी ते मुंबई हा रस्ता जुलै २०२३ पर्यंत खुला करण्यात येणार आहे. या महामार्गामध्ये राज्यातील दहा जिल्हे, २६ तालुके आणि ३९२ गावांचा समावेश असून, सहापदरी असलेल्या या महामार्गाची लांबी ७०१ किलोमीटर आहे. या महामार्गामुळे १८ तासांचा नागपूर ते मुंबई हा प्रवास आता फक्त ८ तासांत करता येणार आहे. नागपूर ते शिर्डी हे अंतर पार करण्यासाठी पूर्वी १३ तास लागत होते; आता हे अंतर पाच तासांत पार करणे शक्य होणार आहे. तर मुंबई ते औरंगाबाद या प्रवासाचाही वेळ कमी होणार आहे.

नागपूर व मुंबई प्रवास सोयीचा व्हावा यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत ३१ ऑगस्ट २०१५ रोजी नागपूर-मुंबई शीघ्रसंचार द्रुतगती महामार्ग तयार करणार, अशी घोषणा केली होती. दि. ३० नोव्हेंबर २०१५ रोजीच्या पायाभूत सुविधा समितीच्या बैठकीमध्ये हा महामार्ग तयार करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री तथा तत्कालीन नगरविकास व सार्वजनिक बांधकाम (उपक्रम) मंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कार्यवाही सुरू झाली. या यंत्रणेने या कालावधीत गतिमान पद्धतीने केलेले काम निश्र्चितच गौरवास्पद आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत ५५ हजार ३३५ कोटी रुपये आहे. या महामार्गांतर्गत एकूण १९०१ कामांपैकी १७८७ कामे पूर्ण झाली असून, ११४ कामे प्रगतीपथावर आहेत. या महामार्गाच्या दोन्ही बाजूला राहणाऱ्या जनतेच्या जीवनात यामुळे मोठे परिवर्तन घडणार आहे. या प्रकल्पासाठी भूसंपादन एक वर्षाच्या विक्रमी वेळेत पूर्ण करण्यात आले. या रस्त्यामुळे रोजगाराची संधी निर्माण होऊन राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा राजमार्ग निर्माण होण्यास मदत होईल. प्रवाश्यांच्या आरामासाठी द्रुतगती महामार्गालगत २० ठिकाणी सुविधा केंद्रे तयार करण्यात आली आहेत. या रस्त्यांमुळे प्रादेशिक बाजारपेठेत वाढ होऊन शेतमालाची जलद वाहतूक होण्यास मदत होईल. या भागातील उद्योग आणि उत्पादन केंद्रांची क्षमता वाढेल.

या परिसरातील वन्यजीवांना हानी पोहोचू नये यासाठी १०० वन्यजीव मार्ग तयार करण्यात आले आहेत. वन्यजीवांच्या वावरासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या ठिकाणी ध्वनिरोधकाची सोय करण्यात आली आहे. एक हजारांहून अधिक कृत्रिम शेततळ्यांची निर्मिती करण्यात आली आहे. या रस्त्यालगत ११ लाखांहून अधिक झाडे आणि जवळपास २२ लाखांहून अधिक झुडुपे व वेलींचे रोपण करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संवर्धन होण्यास मदत होईल. प्रवास करताना कोणत्याही प्रकारचा अपघात होऊ नये तसेच अपघात झाला, तर तात्काळ मदत मिळावी यासाठी १५ वाहतूक साहाय्य केंद्रे, बचाव व दुर्घटना नियंत्रणासाठी २१ जलद प्रतिसाद वाहने आणि लाईफ सपोर्ट सिस्टिमसह २१ रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या जातील. वाहनांना तत्काळ इंधन मिळावे यासाठी देखील खबरदारी घेण्यात आली आहे. १३८.४७ मेगावॅट सौर ऊर्जा तयार केली जाईल, २२ जिल्ह्यांना गॅस उपलब्धतेची निश्चिती, वाहन चार्जिंग स्टेशनमुळे ऊर्जा बचत होण्यास मदत होईल. वाहनांना टोल आकारणीसाठी 'फास्ट टॅग' प्लाझा निर्माण करण्यात येणार आहे. या प्रवासी वाहतुकीमध्ये कोणत्याही प्रकारच्या अडचणींशिवाय सुरक्षित व सुखकर प्रवास व्हावा यासाठी सर्व सोयी सुविधा निर्माण केलेल्या आहेत. दक्षिण कोरिया सरकारशी झालेल्या करारानुसार या मार्गावर अत्याधुनिक इंटेलिजेंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम पुढील दोन वर्षात द्विपक्षीय निधीद्वारे स्थापित करण्याची योजना आहे. ज्यामुळे या महामार्गावरील वाहतुकीला देखील शिस्त लावता येईल.'कृषी समृद्धी केंद्र' म्हणून ओळखल्या जाणा-या नवीन शहरांची उभारणी या मार्गावर केली जात आहे. अशा नवीन शहरांच्या विकासासाठी १८ स्थळे ठरवलेली आहेत. या ठिकाणी कौशल्य विकास केंद्रे, अत्याधुनिक आरोग्य सुविधा, शैक्षणिक संस्था आणि आयटी पार्क उभारण्यात येणार आहेत. या शहरांमध्ये उभारण्यात आलेले कृषी आधारित उद्योग शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न वाढवण्यासाठी रोजगार, स्वयंरोजगार आणि इतर संधी उपलब्ध करून देतील. या महामार्गामुळे सुमारे ५ लाख लोकांना रोजगार मिळेल, अशी अपेक्षा आहे. हा महामार्ग शिर्डी, वेरुळ, लोणार सरोवर, अजिंठा, औरंगाबाद, त्र्यंबकेश्र्वरचे ज्योतिर्लिंग आणि घृष्णेश्र्वर, नाशिक, इगतपुरी इत्यादी विविध पर्यटन स्थळांना जोडत असल्याने पर्यटनाला चालना मिळेल. दिल्ली-मुंबई एक्स्प्रेस वे आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टच्या माध्यमातूनही मालाची जलद वाहतूक करण्यास सुलभ होईल. भारताचे माजी प्रधानमंत्री स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांनी आपल्या कार्यकाळात सुवर्ण चतुष्कोनची भूमिका मांडली. त्यानुसार मुंबई, दिल्ली, चेन्नई, कोलकोता ही शहरे चौपदरी महामार्गानी जोडली गेली आहेत. त्याचेच दृश्य परिणाम आज पहावयास मिळत आहेत. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही जिल्हे जोडण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग' हा त्याचाच एक भाग. राज्यात कार्यक्षम, सुरक्षित, वेळेची बचत करणारी, सर्वांना परवडणारी व सर्वांसाठीची अशी उत्तम दर्जाची वाहतूक व्यवस्था असणे ही काळाची गरज आहे. बदलत्या काळात महाराष्ट्राला वेगवान प्रगतीसाठी राज्यातील जिल्हे जोडणारी, उत्कृष्ट दर्जाची वेगवान वाहतूक व्यवस्था करण्यासाठी 'हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग' मोलाची कामगिरी बजावेल. महामार्गावर अपघात किंवा बिघाड झाल्यास हेल्पलाईन १८००-२३३२२३३, ८१८१८१८१५५ या क्रमांकावर मदतीसाठी संपर्क साधता येईल. महामार्गावर ठिकठिकाणी हेल्पलाईन क्रमांक प्रदर्शित करण्यात येतील. आपत्कालीन वैद्यकीय सेवांसाठी रुग्णवाहिकेकरीता १०८ या क्रमांकावर संपर्क साधता येईल. १५ रुग्णवाहिका, १५ शीघ्र प्रतिसाद वाहने, १२२ सुरक्षा रक्षक तैनात करण्यात येणार आहेत. उद्घाटनानंतर समृद्धी महामार्ग सर्वांसाठी खुला होईल. सर्वांनी वाहतूक नियमांचे पालन करून प्रवास करावा, द्रुतगती महामार्गावर कुठेही वाहने उभी करू नयेत, सीट बेल्टचा वापर करावा, वेग मर्यादेचे पालन करुन वाहनधारकांनी सुरक्षित व गतिमान प्रवासाचा आनंद घ्यावा. गतिमान रस्ते विकासातून राज्याच्या विकासाचे शासनाने उचललेले हे पाऊल खूपच आश्र्वासक आहे. हा महामार्ग विकासाचा मार्ग ठरेल, या महामार्गालगत राहणाऱ्या जनतेच्या जीवनात थेट परिवर्तन घडून येईल, हे मात्र नक्की!

**- सहायक संचालक संध्या गरवारे-खंडार**

# जागतिक अपंग दिनाचे महत्व...

दरवर्षी मार्च महिन्याचा तिसरा रविवार हा दिवस जागतिक अपंग दिन म्हणून जगभर साजरा केला जातो होता, योच कारण सन १९६० मध्ये मार्च महिन्याच्या तिसऱ्या रविवारी आल्जेरियामध्ये दगडी कोळश्याच्या खाणीत झालेल्या भीषण अपघातात हजारो मजूर काही क्षणातच अपंग झाले, त्यावेळेच्या उपलब्ध आकडेवारीप्रमाणे अपघातानंतर सुरक्षा जवान, पोलीस व स्वयंसेवकांनी खाणीच्या कपारीतून बाहेर काढलेल्या हजारो मजुरांपैकी शेकडा २० टक्के मृत्युमुख्यी पडले. ६०टक्के मजूर अस्थिव्यंक झाले, १५ टक्के मजूर अंध, तर ५ टक्के मजूरांची वाचा-श्रवण व मती हिरावली गेली. धडधाकट असून केवळ भाषिक, वैचारिक व शारीरिक हालचालीची यंत्रझा ठप्प झाल्यामुळे त्यांची सेवा हिरावून घेण्यात आली.


एकंदरित या भीषण अपघातात ८० टक्के मजूरी जरी वाचले असले तरी त्यांना प्राप्त झालेल्या विविध प्रकारच्या अपंगत्वाची भीषणता मरणापेक्षाही भयंकर होती व त्यातूच म्हणून की काय अल्जेरियन मजूर विमा योजनेचा लाभही त्यांना मिळू शकला नाही, कारण नियमाप्रमाणे केवळ मृत्यमुखी पडलेल्यांनाच हा लाभ मिळाला. बाकी ८० टक्के मजूर अपंगत्वाचा शाप घेवून आपल्या कुटूंबावर भार माझत्र झाले. त्यामुळे या जीवंत असलेल्या पण अपंगत्व आलेल्या अपंगांनी मजूर विम्याचा लाभ मिळावा म्हणून तीव्र स्वरुपाचे आंदोलन करुन अल्जेरियन सरकारला व जगाला या प्रश्नाच्या तीव्रतेची जाणीव करुन दिली.

या घटनेनंतर संयुक्त राष्ट्र संघाच्या आम सभेत हा प्रश्न चर्चिला गेला व अपंगत्वाचा हा प्रश्न केवळ अल्जेरिया पुरता मर्यादित नसून हा सर्व जगाच्या चिंतेचा व विचाराचा प्रश्न बनला, ज्यामुळे संपूर्ण जगात खंबीर पाऊल उचलून अपंगत्वाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने योजना आखल्या व ह्या अल्जेरियन अपघाती शोकांतिकेचा दिवस म्हणून मार्च महिन्याचा तिसरा रविवार हा जगातील सर्व देशांनी जागतिक अपंग दिन म्हणून साजरा करावा असे सर्वानुमते ठरले.

संयुक्त राष्ट्र संघाच्या ठरावाप्रमाणे आपल्या भारत देशातही मार्च महिन्याचा तिसरा रविवार हा जागतिक अपंग दिन म्हणू साजरा केला जायचा. वेगवेगळे दिवस साजरे केला जातात. या सर्व दिनाच्या तारखा निश्चित आहेत, पण जागतिक अपंग दिनाची तारिख निश्चित नसल्याने मार्च महिन्याचा तिसरा रविवार यायचा पण तारखात नेहमी बदल होत असे. त्यामुळे वर्षातल कुठल्याही महिन्याची तारीख निश्चित करावी अशी मागणी अपंग कार्यकर्त्यांनी लावून धरली व १९९५ सालापासून डिसेंबरची तीन तारिख ही जागतिक अपंग दिनाची तारिख निश्चित झाली.

३ डिसेंबरला जागतिक अपंग दिन साजरा केला जातोय. शासनाचा समाज कल्याण विभाग व त्यांच्या अखत्यारितील येणाऱ्या शासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या वतीने ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजनही केले जातेय. मात्र दुःख याचे आहे की, हा दिन साजरा करणे केवळ शासनाचा समाजकल्याण विभाग व अपंगांच्या संस्थापुरते मर्यादित झाले आहे, अजूनही यात शासनाच्या इतर विभागाच्या व समाजाच्या इतर वर्गाचा सहभाग पाहिजे तसा आढळून येत नाही. त्यात अपंग व्यक्तीबरोबर त्याचे आप्त स्वकीय, मित्रमंडळ, नातेवाईक या सर्वाचाच समावेश होतो. शिवाय सध्याच्या यांत्रिक युगात अनेक कारणामुळे होत असलेले अपघात व हिंसाचार कुणाला, केव्हा व कशामुळे अपंगत्व येईल हे सांगता येत नाही, म्हणून समाजाच्या सर्व घटकांनी स्वयंस्फुर्तपणे भाग घेतला पाहिजे व अपंगत्वाच्या पुनर्वसनात व विकास कार्यात कर्तव्यबुध्दीने सहभाग दिला पाहिजे. अपंगांच्या समस्या जाणून घेवून त्याच्या सोडवणूकीकरिता आपल्याला काय करता येण्यासारखे आहे, याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे.

अशा प्रकारच्या विस्तृत, व्यापक सहभागातूनच अपंग दिन खऱ्या अर्थाने यशस्वीपणे साजरा केला जावू शकतो. या दिवशी अपंगत्व टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना, अपंगत्व आलेल्यांना अपंग कल्याण योजनांची माहिती सर्वदूर देणे, आणि अस्तित्वात नसलेल्या



परंतु परिस्थितीनुसार व बदलत्या काळानुसार नवीन काही योजना विकसीत करणे, अपंगाच्या विश्वातील भावनिक व मानसिक आंदोलनाची माहिती समाजाला देवून त्यांचेकडे दया बुध्दीने न पाहता कर्तव्यबुध्दीने मदतीचा हात पुढे करावा म्हणून वातावरण निर्मितीसी समाज प्रबोधन करणे,अशा प्रकारचे कार्य होणे अगत्याचे आहे, आणि असे झाले तरच जागतिक अपंग दिन खऱ्या अर्थाने साजरा केला जातोय असे वाटेल..

**- तुकाराम बनसोडे; संस्थापक अध्यक्ष;**
**महाराष्ट्रीय अपंग विकास मंच (९५५२०६१८५०)**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : अॅड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# वळसंग पोलीस ठाणे नूतनीकरण व सुशोभीकरणाचे उद्घाटन!



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

वळसंग पोलीस ठाणे वार्षिक तपासणी अनुषंगाने विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परीक्षेत्र कोल्हापूर यांची भेट पोलीस ठाणे असल्याने त्याचे निमित्त साधून वळसंग पोलीस ठाणे परिसरात झालेले ऑक्सिजन पार्क, वॉकिंग ट्रॅक, हॉलीबॉल ग्राऊंड, मियावा की जंगल, वनभोजन कट्टा, ओपन जिम, विहीर पुनर्जीवन, गुन्हे अभिलेख व शस्त्रागार सुशोभीकरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, तारेचे कंपाउंड, लोखंडी प्रवेश गेट, प्रवेश कमान, मंदिर सुशोभीकरण, माझे गाव माजी सुरक्षा अंतर्गत सीसीटीव्ही कॅमेरा व सायरन, पार्क साऊंड पोल अशा विविध कामांचे उद्घाटन या निमित्ताने माननीय मनोज लोहिया विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र कोल्हापूर यांच्या शुभहस्ते झाले. सदर कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर अक्कलकोट विभाग, वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या उपस्थितीत झाली. सदर कार्यक्रमाच्या वेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे दक्षिण सोलापूरचे अभियंता यामुलकर त्याचबरोबर एनटीपीसी होटगी याच्याकडून रेड्डी, अल्ट्राटेक सिमेंट कंपनी होटगी यांच्याकडून महादेव बालगी, झूआरी सिमेंट कंपनी औज यांच्याकडून दीपक कक्कड, चेट्टीनाड सिमेंट कंपनी औज यांच्याकडून श्रीनिवास, वळसंग ग्रामपंचायतीच्या वतीने वळसंग ग्रामपंचायतचे सरपंच महानंदा दुधगी तसेच व वळसंग पोलीस ठाणे अधिकारी व अंमलदार यांच्या वतीने म्हाळप्पा सुरवसे पोलीस उपनिरीक्षक व श्रीनिवास दासरी सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक यांचा या निमित्ताने सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्या वेळेस पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले मनोगत व्यक्त करताना सदर झालेले काम हे चांगले असून त्यामुळे पोलीस ठाण्याचे रूपडे पालटण्यास मदत झालेली आहे. तसेच यावेळी मनोज लोहिया विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापूर परिक्षेत्र यांनी आपले मनोगत व्यक्त करताना पोलिसांनी जनता यांच्या समन्वयातून वळसंग पोलीस ठाण्याचे झालेली सर्व कामे याचं कौतुक केलं त्याचबरोबर जनता आणि पोलीस यांचे यांच्या समन्वयातून झालेली हे काम निश्चितच कौतुकास्पद आहे. तसेच वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीत मि यावा की जंगल बनवून पक्षांना देखील हक्काचे घर प्राप्त झाल्याचा आनंद व्यक्त केला. अशाच पद्धतीचे जंगल ज्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे अशा अन्य पोलीस ठाण्यामध्ये देखील करण्याचे अपेक्षा व्यक्त केले. सदर कार्यक्रमानंतर वळसंग पोलीस ठाण्याचे वार्षिक तपासणी चे काम झाले. त्यानंतर सदर कार्यक्रम चे आभार प्रदर्शन महादेव होटकर माजी सरपंच वळसंग ग्रामपंचायत यांनी केले व कार्यक्रमाची सांगता झाली या कार्यक्रमाला विविध कंपन्यांचे अधिकारी व अंमलदार त्याचबरोबर पोलीस पाटील, वळसंग पोलीस ठाणे अधिकारी व अंमलदार वृंद उपस्थित होते.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची लातूर येथील हॉटेल रायगडवर कारवाई; बारा आरोपींना अटक



**लातूर/आंबादास करकरे**

राज्य उत्पादन शुल्क नांदेड विभागाचे विभागीय उप आयुक्ता श्रीमती उषा वर्मा यांनी दिलेल्या निर्देशानुसार लातूर जिल्हयाचे अधीक्षक केशव गोपीनाथ राऊत, राउशु, लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २५/११/२०२२ कालावधीमध्ये निरीक्षक लातूर विभाग व निरीक्षक उदगीर विभाग यांच्या संयुक्त पथकाने औसा रोड, लातूर येथील हॉटेल रायगड या धाब्यावर कलम ६८ व ८४ अन्वये अवैध मद्यप्राशन विरुध्द कार्यवाही करुन त्यामध्ये एकूण १२ आरोपींना अटक करण्यात आली.

सदर गुन्हयामध्ये ६ हजार ३०० रुपयांचा अवैध मुद्देमाल जप्त करण्यात आला. मागिल नोंदविलेल्या गुन्हयापैकी अवैध हॉटेल व धाबा मालाक व मद्यपींवर केलेल्या कारवाईमध्ये अवैध धावा मालक व अवैध ठिकाणी मद्यप्राशन करणाऱ्यांना मा. न्यायालया समोर हजर केले असता मा. न्यायालयाने धावा मालकास २५ हजार रुपयांचे तसेच मद्यपींना प्रत्येकी रु. ५०० रुपायाचे दंड ठोठावला आहे. सदरच्या कारवाईमध्ये अधीक्षक राउशु, लातूर केशव गोपिनाथ राऊत, निरीक्षक-लातूर विभाग, आर. एम. बांगर, निरीक्षक उदगीर विभाग आर. एम. चाटे, दुय्यम निरीक्षक एल. बी. माटेकर, ए. के. शिंदे, स्वप्नील काळे, अ. ब. जाधव व सहाय्यक दुय्यम निरीक्षक ए. एल. कारभारी, गणेश गोले, जवान- अनिरुद्ध देशपांडे, हनमंत मुंडे, संतोष केंद्रे, सुरेश काळे, श्रीकांत साळुंके, ज्योतीराम पवार यांनी सहभाग नोंदविला. अवैध मद्यविक्री तसेच मद्यपी व अवैध हॉटेल/धाबा विरोधात कारवाई यापुढेही चालु राहणार असून, अवैध मद्याबाबत माहिती असल्यास टोल फ्री १८००२३३९९९९ क्रमांक व या कार्यालयास माहिती दिल्यास माहिती देणाऱ्याचे नांव गुप्त ठेवले जाईल असे केशव गोपीनाथ राऊत, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, लातूर यांनी सांगुन अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे आवाहन केले आहे.

# जिल्हास्तरीय थ्रो बॉल व कॅरम स्पर्धा संपन्न



**पालघर/प्रतिनिधी**

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आयोजित जिल्हास्तरीय थ्रो बॉल व कॅरम स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल खारेकुरण रोड पालघर येथे करण्यात आले होते. याप्रसंगी उद्घाटक जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रकाश निकम, प्रमुख पाहुणे सोनोपन दांडेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ किरण सावे उपस्थित होते उपस्थिताचे स्वागत जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने यांनी केले. या कार्यक्रमाची सुरुवात महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून करण्यात आली. यावेळेस पालघर जिल्ह्यातील ४०० खेळाडू, शिक्षक व प्रशिक्षक सहभागी होते. उद्घाटन पर भाषण करताना आदिवासी ग्रामीण भागातील खेळाडूंना उच्च प्रतीचे प्रशिक्षण व सुविधा मिळण्याच्या दृष्टीने पालघर जिल्हा क्रीडा संकुल उच्च प्रतीचे व आदर्शवत निर्माण करू व त्यास सर्वतोपरी मदत करू असे आश्वासन प्रकाश निकम यांनी केले. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ किरण सावे यांनी पोलिओग्रस्त मुलगी ते ऑलम्पिक मेडलिस्ट खेळाडूंचे उदाहरण देऊन खेळाडूंच्या मनात खेळ व पदक प्राप्त करण्यासाठी जिद्द आणि सातत्य कसे असावे या बाबत मनोगत व्यक्त केले व खेळाडूंच्यात नवसंजीवनी, प्रेरणा निर्माण केली. या प्रसंगी सम्राट बॅडमिंटन अकॅडमीचे श्री. गवई प्रकाश पळसुले, श्री. गमरे व इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय पंच, दांडेकर महाविद्यालयाचे क्रीडा संचालक श्री. रक्तकर्ण प्रा. किरण थोरात यांनी केले. तर आभार प्रदर्शन तालुका क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांनी केले.

# घरफोडी करणारी महिला आचोळे पोलिसांच्या जाळ्यात



**नालासोपारा/प्रतिनिधी**

नालासोपारा पूर्व येथील रश्मीगार्डन इमारतीत राहणाऱ्या दिव्या पटेल यांच्या घरी झालेल्या घरफोडी प्रकरणी त्याच इमारती मधील हर्षित गुप्ता या तरुणीला तिच्या मित्रासह पोलिसांनी अटक केली असून तिच्याकडून ७,३०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दिव्या पटेल यांच्या घरातून १,००००० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि ८,३६,००० रुपये रोख रक्कम आदी मिळून ९,३६,००० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीला गेला होता. या प्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात २६/११/२०२२ रोजी गु.र.क्रमांक ५८७/२०२२ भादवीकलम ३८०,४५४,४५७,३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही तपासून तसेच या भागातील काही रहिवाशांकडे चौकशी करून तपास केला आणि आरोपीला अटक केली. हि कारवाई पोलीस उपयुक्त सुहास बावचे परिमंडळ-२, सहा.पोलीसायुक्त चंद्रकांत जाधव, तुळींज विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली आचोळे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रकांत सरोदे, पो.नी.सुधीर गवळी, सपोनि यशपाल सूर्यवंशी, पो.उप. निरीक्षक सुहास म्हात्रे, सहा. फौ. राजेश काळपुंड, पो.ह. दत्तात्रय दाईंगडे, बालाजी संगमे, कपिल बंडगर, विनायक कचरे यांच्या पथकाने पार पडली.

# वाडा तालुक्यातील परळी आश्रमशाळेला शैक्षणिक साहित्य मेळाव्यात सुयश

**वाडा/प्रतिनिधि**



एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार यांच्या अंतर्गत येणाऱ्या शिक्षण विभागाच्या एज्युकेशन रिसर्च सेल मार्फत सोमवारी (दि. ५ डिसेंबर) जव्हार तालुक्यातील विनवड येथील आश्रमशाळेत शैक्षणिक साहित्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात वाडा तालुक्यातील परळी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेच्या विध्यार्थ्यांनी आपली कला प्रदर्शित करतांना Joyful Chemistry हा शैक्षणिक प्रकल्प सादर केला. त्यात उच्च माध्यमिक गटामध्ये या शैक्षणिक साहित्यास प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. अनेक विद्यार्थ्यांच्या मनात रसायनशास्त्रातील घटक आवर्त सारणी व मुलद्रव्याचे गुणधर्म विषयी भिती असते. पण हि भीती नाहीशी करुन विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने समजून घेण्याकरीता रसायनशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका वृषाली पाटील त्याच बरोबर प्राध्यापक विलास बंजारा, मयुर वाडीले यांच्या मार्गदर्शनातून ११वी विज्ञानाच्या तीन विद्यार्थ्यांनी हा प्रकल्प सादर केला. या उपक्रमात प्राप्त झालेल्या सर्व प्रकल्पात एक वेगळेपण दाखवीत या शैक्षणिक साहित्यास प्रथम क्रमांक (उच्च माध्यमिक गट) मिळाल्याने या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प जव्हार प्रकल्प अधिकारी आयुषी सिंग (आय.ए.एस) व शिक्षण विभागाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी सुभाष परदेशी यांच्या उपस्थीतीत चषक व व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

# राजमाता जिजामाता संकुलात महामानवास विनम्र अभिवादन




**लातूर/प्रतिनिधी**

विश्वरत्न, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात संकुलाचे प्रमुख प्राचार्य डी. एन. केंद्रे यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. या अभिवादन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष के. ए. जायेभाये होत्या. यावेळी प्राचार्य संगमेश्वर केंद्रे, संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे,राजीव मुंढे,राजेंद्र जायेभाये, प्रा. अश्विनी केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, प्राचार्य जी. आर. मुंडे, मदन धुमाळ, सुधाकर लोहकरे, सुनीता जवळे, पांडुरंग कुलकर्णी, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले की, भीमराव रामजी आंबेडकर तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी झाला तर त्यांचे महापरिनिर्वाण दि. ६ डिसेंबर १९५६ रोजी झाले. डॉ. आंबेडकर हे भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजकारणी, तत्त्वज्ञ आणि समाजसुधारक होते. त्यांनी दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा दिली आणि अस्पृश्य लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी चळवळ उभारली. तसेच महिलांच्या आणि कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले. ते ब्रिटिश भारताचे मजूरमंत्री, स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय बौद्ध धर्माचे पुनरुज्जीवक होते. देशाच्या विविध क्षेत्रांत त्यांनी दिलेल्या योगदानामुळे त्यांना 'आधुनिक भारताचे शिल्पकार' किंवा 'आधुनिक भारताचे निर्माते' असेही म्हणतात. सूत्रसंचालन राजीव मुंढे यांनी केले तर आभार पर्यवेक्षिका शोभा कांबळे यांनी मानले. या प्रसंगी संकुलातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाणी आणि घरकुल योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा -आम.सुनिल भुसारा

**वाडा/प्रतिनिधी**



ग्रामीण भागातील पाणीटंचाईचा प्रश्न कायम स्वरूपी मिटावा यासाठी जलजीवन मिशन आणि घरकुलांपासून कोणीही लाभार्थी वंचित राहू नये यासाठी अमृत महाआवास अभियानाची प्रभावी अमलबजावणी करण्याचं आवाहन आमदार सुनिल भुसारा यांनी वाड्यातील कार्यशाळेत केलं. वाडा पंचायत समितीने बुधवारी आयोजित केलेल्या या कार्यशाळेत आमदार भुसारा आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांनी पाणीटंचाई आराखडा आणि घरकुल योजनेचा आढावा घेतला. केंद्रसरकार आणि राज्यसरकारने जल जीवन मिशन आणि अमृत महाआवास अभियानाच्या माध्यमातून पाणी आणि घरकुल योजना राबविण्याला प्राधान्य दिले आहे. जल जीवन मिशन अंतर्गत २०२४ पर्यंत प्रत्येक कुटुंबाला स्वच्छ पाणी पुरवठा तर मार्च २०२२ पर्यंत घरकुल योजनेचा लक्षांक पूर्ण करण्यासाठी अमृत महा आवास अभियान हे शंभर दिवसांचे अभियान राबविले जात आहे. त्याअंतर्गत आढावा घेण्यासाठी आमदार भुसारांनी आपल्या विधानसभा क्षेत्रातील विक्रमगड, जव्हार, मोखाडा आणि वाडा ह्या तालुक्यां तालुकानिहाय आढावा बैठका घेतल्या. बुधवारी वाडा तालुक्याचा आढावा घेण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेस तालुक्यातील सरपंच व ग्रामसेवक उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना आमदार भुसारांनी वरील उद्गार काढले. गावाच्या विकासासाठी सरपंचांनी अथवा कोणत्याही लोकप्रतिनिधींनी राजकीय पक्षांचे जोडे बाजूला सारून काम करावं असं आवाहन भुसारा यांनी नवनिर्वाचित सरपंचांना केलं. यावेळी पालघर जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती रोहिणी शेलार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रविंद्र शिंदे, वाडा पंचायत समितीच्या सभापती अस्मिता लहांगे, उपसभापती जगदीश पाटील, जिल्हा परिषद सदस्य अक्षता चौधरी, भक्ति वलटे, मिताली बागूल, पंचायत समिती सदस्य रघुनाथ माळी, अमोल पाटील, योगेश गवा, सागर ठाकरे पुनम पथवा, दृष्टी मोकाशी, गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ आदी उपस्थित होते.

# देवणी येथील रसिका महाविद्यालयात महिला संदर्भात कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी येथील कै. रसिका महाविद्यालयात युवती कल्याण मंडळाच्या वतीने शुक्रवार दि.९ डिसेंबर रोजी महिला संदर्भात कायदेविषयक मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी रसिका महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शिवाजीऔ सोनटक्के होते तर कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून विधिज्ञ ॲड. शिवानंद मळभागे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ॲड. शिवानंद मळभागे यांनी कायदेविषयक मार्गदर्शन करताना सांगितले की, महिलांसाठी कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण मिळावे यासाठी २०१३च्या प्रतिबंधक कायद्या विषयी सखोल अशी माहिती दिली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन प्राध्यापक डॉ. अनिता सोनवणे, युवती कल्याण मंडळाच्या सदस्या प्राध्यापक. डॉ. रेणुका कुनाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिव्या तदलापुरे या विद्यार्थिनींने केले तर आभार स्वामी अंजली या विद्यार्थिनीने मानले. कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. गोपाल सोमानी यांचे व अंकुश भुसावळे यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सोनिया गांधी यांच्या ७६वा वाढदिवसानिमित्त भिवंडी येथील उपजिल्हा रुग्णालयात शाल वाटप

भिवंडी : भिवंडीत महाराष्ट्र युवक काँग्रेस शहर अध्यक्ष राहुल पाटील यांच्या नेतृत्वातखाली सोनिया गांधी यांच्या ७६ वा वाढदिवसानिमित्त भिवंडीतील उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर, नर्स तसेच सफाई कामगार यांना थंडीच्या बचावासाठी शंभरहून अधिक शाल चे वाटप करण्यात आले यावेळी भिवंडी शहर युवक काँग्रेसचे अध्यक्ष राहुल पाटील, रेहाना अन्सारी, डॉक्टर निलेश जेडगे, दिनेश प्रजापती, अमित ढोले, आकाश, साईनाथ चिलका, सचिन कांबळे, बाळा अंदुरे, प्रशांत बीमन महाराष्ट्र युवक काँग्रेस चे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



**श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूरद्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय (राष्ट्रीय सेवा योजना आणि महाविद्यालय जयंती उत्सव समिती), लातूर व्दारा आज थोर संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रभारी प्राचार्य कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, डॅा.विजयकुमार सोनी, नामदेव बेदरगें, यशपाल ढोरमारे, आनंद खोपे, लता चौदंते, संतोष राठोड, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.**

12 TO 18 DECEMBER 2022 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 12/10/2022 8:48 PM Page 1



# सोलापूर शहरात पकडली पाऊणे दोनशे लिटर फ्रुट बियर, दोघांना घेतले ताब्यात

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर विभाग राज्य उत्पादन शुल्क विभागाने आठ डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास सोलापूर शहर परिसरात केलेल्या कारवाईत १७६ लिटर फ्रुटबियर जप्त केली असून दोन आरोपींना अटक केली आहे. राज्य उत्पादन शुल्क अ २ विभागाच्या दुय्यम निरीक्षक उषाकिरण मिसाळ यांना मिळालेल्या खात्रीलायक बातमी नुसार त्यांनी जवान शोएब बेगमपुरे यांच्यासह एमआयडीसी रोड परिसरात विनायक नगर येथील एका पत्र्याचे शेडमध्ये व्यंकटेश सोमनाथ दोमल, राहणार सिद्धेश्वर नगर सोलापूर याच्या ताब्यातून सहाशे पन्नास ६५० मिली क्षमतेचे दहा बॉक्स मध्ये युनिक ड्रिंक्स असे लेबल असलेले फ्रुट बियरच्या १२० बाटल्या ज्याची किंमत तीन हजार सहाशे पन्नास इतकी आहे जप्त केला आहे. तसेच साईबाबा चौक येथील गोवर्धन किराणा दुकानाच्या



डाव्या बाजूस असलेल्या पत्र्याच्या शेड मधून अंबादास पिराजी गायकवाड, राहणार संजय नगर, कुमठा नाका त्याच्या ताब्यातून ६५० मिली क्षमतेच्या सेलिब्रिटी ड्रिंक्स असे लेबल चिकटवलेल्या फ्रुट बिअरच्या १५० बाटल्या असा एकूण पाच हजार चारशे रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. दोन्ही कारवाईत आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्याचे कलमांतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सीमा तपासणी नाका नांदणी येथील पथकाने ७ डिसेंबर रोजी दक्षिण सोलापूर तालुक्यातील तिल्लेहाळ तांडा या ठिकाणी हातभट्ट्यांवर धाडी टाकून त्या ठिकाणी तीन गुन्हे नोंदवले असून एक हजार तिनशे पस्तीस लिटर हातभट्टी दारू व चार हजार लिटर गुळमिश्रित रसायन असा एकूण एक लाख बासष्ट हजार सहाशे रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. ही कारवाई निरीक्षक गुलाब जाधव, सहायक दुय्यम निरीक्षक मुकेश चव्हाण, जवान वसंत राठोड व वाय.बी. तोग्गी यांच्या पथकाने केली आहे.

## देवणी तालुक्यात ८ ग्रामपंचायतीसाठी सदस्य पदासाठी २३३ तर सरपंच पदासाठी ४० अर्ज दाखल

देवणी : देवणी तालुक्यातील ८ ग्रामपंचायतीसाठी होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी नामनिर्देशन अर्ज स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजेच शुक्रवार दि.२ डिसेंबर रोजी सायंकाळ पर्यत ग्रामपंचायतीच्या सदस्य पदासाठी २३३ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत तर सरपंच पदासाठी ४० उमेदवारी अर्ज दाखल झाले असल्याची माहिती तहसील प्रशासनातील निवडणूक विभागाच्या वतीने देण्यात आली. देवणी तालुक्यातील टाकळी, बोंबळी, हेळंब, सय्यदपूर, दवणहिप्परगा, बोरोळ, वडमुरंबी येथील ग्रामपंचायतीच्या सरपंच व सदस्य पदासाठी निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येत असून ग्रामपंचायत सदस्य पदासाठी शुक्रवारी सायंकाळ पर्यत २३२ उमेदवारांनी २३३ उमेदवारी अर्ज दाखल केले असून सरपंच पदासाठी ३९ उमेदवारांनी ४० उमेदवारी अर्ज दाखल केले आहे.

पान १ वरून...

### अभिनेत्रीच्या आयुष्याची शोकांतिका ...

आईची हत्या केली. आईची हत्या केल्यानंतर ४३ वर्षीय आरोपी मुलाने पोलिसांपासून वाचण्यासाठी मृतदेह माथेरानमध्ये फेकून दिला.पोलिसांनी आरोपी मुलाची ओळख सचिन कपूर म्हणून केली आहे. सचिन त्याची आई वीणा कपूरविरुद्ध कोर्टात खटला लढत असल्याचे सांगण्यात आले. मालमत्तेवरून दोघांमध्ये वाद सुरू होता. पोलिसांनी घरचा नोकर लालू कुमार मंडल यालाही अटक केली आहे.

### भिवंडीत झाला गोळीबार...

लोढामध्ये कामगार पुरविण्याच्या कामा वरून गणेश कोकाटे व गणेश इंदुलकर यांच्यात वाद होता .यापूर्वी गणेश कोकाटे यावर गणेश इंदुलकर याने गोळीबार केला होता त्यामध्ये चितळसर मानपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून त्यामध्ये चार जण अटक असून गणेश इंदुलकर हा फरार होता. त्यानंतर बुधवारी सायंकाळी गणेश कोकाटे ठाणे येथून कशेळी येथील घरी येत असताना त्यावर दुचाकी वरून आलेल्या आरोपीने गोळीबार करून फरार झाले आहेत.या घटने नंतर गंभीर जखमी गणेश यास ठाणे ज्युपिटर रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी त्यास मृत घोषित केले. व्यवसायिक वादातून ही हत्या झाली असून पोलिसांनी तीन पथके फरार आरोपीचा शोध घेत असल्याची माहिती नारपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मदन बल्लाळ यांनी दिली आहे. घटनेची माहिती मिळताच भिवंडी पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळे, पोलीस उपायुक्त (गुन्हे) शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर खैरनार,सुनील वडके यांनी घटनास्थळी भेट दिली. आरोपींच्या अटकेसाठी स्थानिक नारपोली पोलिसांसह गुन्हे शाखा भिवंडी ठाणे अशी तीन पथके तैनात करण्यात आली आहेत. दरम्यान गणेश कोकाटे याने सप्टेंबर मध्ये झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर नारपोली पोलिसांकडे आरोपी गणेश इंदुलकर याच्या कडून जीवाला धोका असल्या बाबत तक्रार दिली होती. त्यामध्ये ही नारपोली पोलीस फरार आरोपी गणेश इंदुलकर याचा शोध घेत होते.

### संशयाचा किडा डोक्यात शिरला...

आजोळ असून येथे तो पत्ननीसह दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरी करून राहत आहे. कविता ही दिसायला देखणी आणि सुंदर असल्याने चंद्रकांत हा नेहमी तिच्यावर संशय घेत होता.याला कारण ही तसेच होते.कारण अलिकडे ती आपल्या मोबाईलवरून तास न तास कुणाशी तरी हवत खिदळत बोलत होती.त्याच्याशी मनमोकळेपणाने बोलत असल्याचे बघून चंद्रकांत याच्या तळपायाची आग मस्तकात जात होती. तो ही तिच्याबरोबर दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरीसाठी जात होता. पण कविता ही हल्ली त्याला चुकवून दुसरीकडे शेतात कामाला जात होती. त्यातच चंद्रकांतला ती गावातीलच एका तरूणाला चिकटली असल्याचे समजले होते. तो तरूण दुसरा तिसरा कुणी नसून तो राहत असलेल्या गल्लीतील शेजारचाच असल्याचे त्याला समजले होते. कविता ही काम चुकवून त्याला भेटत होती.त्याला आपल्या अंगावर खेळवत होती. याची त्याला माहिती मिळाली होती.मौजे वडगाव हे गाव तसे लहानच गावात एखादी घटना घडली की लगेच गावात चर्चा होत होती. त्यातच कविता ही त्या तरूणाला कोल्हापूरला इतर ठिकाणी भेटायला जात असल्याची माहिती चंद्रकांतला समजली होती. गावात ही चर्चा हळूहळू रंगत होती. ही चर्चा चंद्रकांतच्या कानावर आल्याने तो जासतच तिच्यावर चिडला होता . त्यामुळे तो भांडण उकरून काढून तिला मारहाण करीत शिवीगाळ करीत होता. या कारणातून त्याची नेहमी होणारी भांडणे ही शेजाऱ्यात चर्चेचा विषय ठरत होती. अलिकडे चंद्रकांत ही तिला आपल्या बरोबरच कामाला घेऊन जात होता. लहान मुलगा हा पाचवीत शिकत असल्याने तो दिवसभर शाळेत जात होता. त्याच्या डोक्यात कविताच्या चारित्र्याचा संशय येत असल्याने तो तिच्याकडे त्याच नजरेने बघून तिला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून जा तु त्याच्याबरोबरच झोप जा. असे म्हणत होता. ती त्याच्या बोलण्याकडे लक्ष देत नव्हती. तिला माहित होते की नवरा जास्त दारू प्यायला की जास्तच भकलतो. त्यामुळे ती ही त्याला जास्त किंमत देत नव्हती त्याचा मार ती मुकाटयाने सहन करीत होती. ती गप्प बसते आपला मार खाते याचा त्याने वेगळाच अर्थ काढला होता.हिचे बाहेर लफडे असल्या शिवाय ही गप्प बसते काय? असे तो म्हणत होता. त्या दोघांची भांडणे बऱ्याचवेळेला आजी आजोबांनी सोडविली होती. पण हल्ली कविता ही त्याला तो मारहाण करीत असताना उलटे बोलत होती. भांडणात तुम्ही माझ्यावर विनाकारण संशय घेवू नका मी काही त्यातली बाई नाही.उगाच डोक्यात राख घालून घेवून संसाराचे वाटोळे करून घेवू नका असे ती त्याला सांगत होती पण त्याच्या डोक्यात एकच विचार हिचे लफडे त्याच्याबरोबर आहे.तरी ही ती आपल्याला खोटे बोलत आहे. खरे तर तो संशयाने पछाडलेला होता. त्याला यातील खरे खोटे काही माहित नव्हते. पण तो नुसता साप साप म्हणून काठी बडवत होता. पोटात दारू गेली की त्याला कविताच्या चारित्र्याच्या संशयाची खात्री वाटत होती. तो वाटेत किंवा कामावर असताना ही तिच्याबरोबर या कारणातून भांडण काढून तिला मारहाण करीत होता. त्याच्या डोक्यात फक्त तो एकच विषय असल्याने तो कधी ही कुठे ही तिच्याबरोबर भांडण काढत होता. तिचा तिच्या माहेरच्या लोकांचा उद्धार करीत होता. त्यामुळे हल्ली तिला ही त्याचा राग येत होता.त्यामुळे मागे एकदा भांडणात ती आपल्या लहान मुलाला घेऊन माहेरी गेली होती. त्यावेळी ती लवकर परत आली नव्हती. दोन चार महिन्यांनी तो तिला आणायला गेल्यावर त्याच्या सासु सासऱ्यांनी ही त्याची चांगलीच झाडाझडती घेतली होती. त्यांनी कविताचे म्हणणे खरे धरून त्याला चांगलेच झापले होते.याचा ही त्याला राग आला होता. म्हणजे बायको खरे बोलते आणि आपण खोटे पडतो असा त्याने अर्थ काढला होता. मौजे वडगावला ते दोघे परत आल्यावर त्याने त्याच दिवशी परत कविता बरोबर भांडण उकरून काढून तिला बडता बडवले होते. आपण का परत इकडे आले कशाला असे तिला झाले. तरी ही ती आपल्या दोन्ही मुलांच्याकडे बघून त्याच्याबरोबर संसार करीत होती. तो कामावर चल म्हटला की त्याचेबरोबर जात होती ती त्याच्याबरोबर कामावर गेली तरी तो काही तरी निमित्य काढून भांडण काढत होता. कामावर त्या दोघा नवरा बायकोची भांडणे लागल्यावर जवळ असणाऱ्यांना त्याची भांडणे मिटविताना नाकी नऊ येत होती. भांडणात तो कविताला अर्वाच्च भाषेत शिव्या देऊन तिला मान खाली घालायला लावत होता. हल्ली तो दारू ही जास्त पित असल्याने दारूच्या नशेत तो राहत होता. काम कमी पण भांडण जास्त असे झाले होते. त्याच्या डोक्यातील तिच्या चारित्र्याचा संशय काही केल्या कमी होत नव्हता. तो तिला जा रांड त्याच्याबरोबर माझ्या संसाराची कशाला वाट लावलीस असे बोलत होता. तो कधी तिच्याशी भांडण उकरून काढेल हे काही सांगता येत नव्हता.त्या दोघांची भांडणे विकोपाला गेली होती. बुधवार दि.२३ रोजी ते दोघे गावाजवळच असलेल्या शेतात कामाला गेले होते.तो त्यावेळी ही दारू पिऊनच होता.दुपार पर्यत कविताने कसे तरी काम ओढले. दुपारी १ वाजणेच्या सुमारास ते दोघे आणि कामावरील इतर दोघी बायका काम संपवून सुतार पाणंद रस्त्याने येत असताना दारूच्या नशेत असणाऱ्या चंद्रकांतने कविताबरोबर वाटेतच भांडण काढायला सुरूवात केली. तो जास्त दारू प्यायला असल्याने तिने त्याच्याकडे दुर्लक्ष करीत इतर बायकांच्याबरोबर जात होती.बायको आपले काही ऐकून घेत नाही म्हटल्यावर त्याला जास्तच राग आला. तो तिला म्हणाला. मी तुझा नवरा आहे का यजमान? तु माझे काही ऐकत नाहीस, तुझ्या यजमानाचे ऐकणार तु थांब तुला आता ठेवीतच नाही असे म्हणत त्याने आपल्याकडील विळा काढला आणि पाठीमागून कविताच्या गळ्यावर घातला. त्यासरशी कविता ओरडत खाली पडली. तिच्या गळ्यातून रक्ताची धार लागली होती. तेवढयावरच तो न थांबता त्याने परत त्याच विळ्याने तिच्या पोटावर मानेवर वार केले. ती रक्ताच्या थारोळ्यात रस्त्यासवर पडली. पुढे गेलेल्या बायका तिच्या ओरडण्याने परत मागे आल्या. चंद्रकांतच्या हातात रक्ताने माखलेला विळा होता. तो दात ओठ खात कविताला शिव्या देत होता. त्याने कविताचा घात केल्याचे लक्षात येताच दोघी बायका ओरडल्या काय केलेस रे भडव्या असे त्या त्याला म्हणाल्या. कुणी तरी या घटनेची माहिती मौजे वडगाव गावात दिली. गावातून लोक ही पळत सुतार पाणंदकडे आले. बघता बघता घटनास्थळी लोकांची गर्दी जमली. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याचा लोकांना अंदाज आला होता. ते चंद्रकांतला शिव्या घालत होते. कुणी तरी या घटनेची माहिती हातकणंगले पोलीसांनी दिली. तोपर्यत हातात विळा घेऊन चंद्रकांतच स्वतःहून हातकणंगले पोलीसात हजर झाला. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन घटनास्थळ गाठले. घटनास्थळी शिरोली एमआयडीसी पोलीस स्टेशनचे स.पो.निरी.सागर पाटील व गुन्हे अन्वेषनचे पोलीस यांनी भेट देवून घटनेची माहिती घेतली. घटनास्थळी वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यांनी भेट देवून परिस्थीची पाहणी करून पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या. या घटनेतील संशयीत आरोपी चंद्रकांत कोरवी हा स्वतःहून हातकणंगले पोलीसात हजर झाल्याने आणि त्याने आपला गुन्हा कबुल केल्याने ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याचा अंदाज पोलीसांना आला होता. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनसाठी कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची लेखी फिर्याद मयत कविताच्या माहेरच्या लोकांनी हातकणंगले पोलीसांत दिल्यावर पोलीसांनी कविता कोरवी (वय ३२) हिच्या खून प्रकरणी तिचा पती चंद्रकांत कोरवी (वय ३५) याचे विरोधात भा.दं.वि. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याला हातकणंगले येथील प्रथम वर्ग न्यायालयात हजर केले. मा.न्यायालयाने त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनवाली. या दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला विळा हस्तगत करण्याचा प्रयत्न केला.परंतु त्याने तो विळा ऊसाच्या शेतात टाकल्याचे पोलीसांना सांगितले. घटनास्थळाच्या जवळच्या शेतात पोलीसांनी त्या विळ्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. परंतु पोलीसांना तो विळा सापडला नाही. कथा शब्द बध्द होईपर्यत पोलीस त्या विळ्याचा शोध घेत होते. या घटनेचा पुढील तपास हातकणंगले पोलीस करीत आहेत. संशयाने मन एकदा का पोखरले की तो संशय मनातून जात नाही त्यातूनच अशा प्रकारच्या घटना घडतात हेच या घटनेवरून दिसून येते.

### उसन्या पैशाच्या वादातून मैत्रीला...

मित्राच्या निखळ मैत्रीत सर्व काही माफ असते हे त्यानाही मान्य होते. म्हणून ते एकमेकांना बोलविताना ही शिव्या देऊन काय रे रांडच्या म्हणून बोलवून मगच दुसऱ्या विषयाकडे वळत होते. ऋषीकेश जाधव हा रिक्षा चालवित असल्याने त्याच्याकडे कायम पैशाची आवक असायची. त्यामुळे तो मनात येईल त्यावेळी दारू प्यायचा. कधी अक्षय किंवा दीपक भेटले तर त्यांना ही प्यायला दयायचा. तिघे ही दारू प्यायले की भरकटायचे त्यातच मागे एकदा ऋषीकेश कडून अक्षय याने काही रक्कम उसणे घेतली होती. तो ते ती रक्कम वेळेवर परत देत नसल्याने ऋषीकेश जाधव याने त्या पैशाला व्याज लावले होते. आता त्याच्या मैत्रीत पैशाचा व्यवहार आला होता. त्यामुळे या कारणातून अक्षय आणि ऋषीकेश याची भांडणे ही झाली होती. त्याचेत जरी भांडणे झाली असली तरी त्याची मैत्री काही तुटली नव्हती. ऋषीकेशला ही माहित होत की अक्षयची परिस्थीती बिघडली आहे तो आज ना उदया आपले पैसे परत करेल. म्हणून तो ही काही माहिने गप्प बसला होता. भेटेल त्यावेळी तो अक्षयकडे पैशाची विचारणा करीत होता.अलिकडे दोन चार महिने अक्षयने व्याजाचे पैसे ही ऋषीकेशला दिले नव्हते. त्यामुळे ऋषीकेश हा त्याला कधी दारू प्यायला आणि जेवायला डब घालीत होता. त्यामुळे अक्षय हा त्याचेवर कायम चिडत होता. तो त्याला कायम शिव्या देत होता. तो त्याला दारू प्यायला देऊन मला किती वेळा तु त्रास देणार आहेस तुझ्या त्रासाला मी कंटाळलो आहे म्हणत होता. त्यावर ऋषीकेश हा त्याला तु माझी रक्कम देऊन टाक म्हणत होता. त्या दोघातील आर्थिक व्यवहार हा दीपकला माहित होता. तो ही अक्षयला ऋषीकेशचे पैसे देऊन टाक म्हणून सांगत होता. पण अक्षयची परिस्थीती त्याला ही माहित असल्याने तो त्याला जास्त त्रास देत नव्हता. ते तिघे ही मित्र असल्याने दारू प्यायला जातच होते. हल्ली बारचा खर्च परवडत नसल्याने बरेज जण वाईन शॉपीमधून दारू विकत घेऊन गावाबाहेर ओपन बार करून दारू प्यायला बसत असतात. मंगळवार दि.६ डिसेंबर रोजी रात्री ८च्या सुमारास ते तिघेदारू पिण्यासाठी मिरज जुना मालगाव रोडवरील सांगलीकर मळ्यानजीक दोन दुचाकीवरून गेले. जाताना त्यांनी मिरजेतील एका वाईन शॉपीमधून व्हिसकी, स्नॅक आणि चना घेतले. सांगलीकर मळ्यानजीक एका माळावर निर्जन ठिकाणी ते तिघे ही एकत्र प्यायला बसले.रात्रीच्या अंधारात त्यांनी दोन्ही दुचाकी बाजुला लावल्या. दारूचा एक एक घोट करीत त्यांनी अखंड दारूचा खंबा संपविला.त्यांना दारू कमी पडल्यावर अक्षयने ऋषीकेशला दारू आण, त्यावेळी तो त्याला म्हणाला, पैसे दे मग दारू आणतो. अक्षय त्याला म्हणाला माझ्याकडे आता पैसे नाहीत, तु घाल. मी नंतर देतो. त्यावेळी ऋषीकेशने त्याला शिवी देत तू आधीचे पैसे मला दिला नाहीस आणि आता तु कुठले पैसे देतोस म्हणत त्याच्या कानपटीत जोरात लावली. याचा राग अक्षयला आला. त्यांच्या सोबत दीपक होता. त्याने त्या दोघांची भांडणे सोडविण्याचा प्रयत्न केला. अक्षयला ऋषीकेशने कानपटीत लावल्याने तो ही त्याला शिव्या देत मारायला गेला. कुठले भांडण कुठे पोहचले होते. अक्षयच्या बाजुने दीपक बोलत होता. त्याला ही ऋषीकेशचा राग आला होता. त्याने मुद्दामच भांडण उकरून काढले असल्याने ते दोघे ही त्याचेवर चिडले होते.त्या दोघांनी ऋषीकेशला खाली पाडून मारायला सुरूवात केली. ते ही त्याला शिव्या देत लाथाबुक्कांनी तुडवत असताना अक्षयने बाजुलाच पडलेला एक मोठा दगड उचलला आणि ऋषीकेशच्या डोक्यात घातला. त्यासरशी ऋषीकेशचा चेहरा ठेचला गेला. त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव झाल्याने जागीच त्याचा मृत्यू झाला. आपल्या हातून ऋषीकेशचा खून झाला आहे हे लक्षात आल्यावर दीपक आणि अक्षय भानावर आले. त्याची दारूची नशा पुर्ण उतरली. कोणाला काही लक्षात येण्या अगोदर त्यांनी त्याचा मृतदेह ओढत बाजुलाच असलेल्या ३० फुट अंतरावरील झाडाझुडापात नेऊन टाकला. त्यानंतर ते दोघे मिरजेत आले. आणि आपआपल्या घरी काही झालेच नाही आशा अविर्भावात गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी सांगलीकर मळ्याशेजारील लोक फिरायला गेल्यावर त्यांना एका झाडाझुडपात एका तरूणाचा मृतदेह पडला असल्याचे दिसून आले. मृत तरूणाचा चेहरा दगडाने ठेचलेला दिसून येत होता.कुणी तरी या घटनेची माहिती मिरज ग्रामीण पोलीसांना दिली. घटनास्थळी पोलीस निरी. संजीव झाडे आणि गुन्हे प्रकटीकरणाचे पोलीस दाखल झाले. सांगलीकर मळ्यानजीक असणाऱ्या रस्त्यावरील एका झाडाझुडपात तरूणाचा मृतदेह पडला होता. त्याचा चेहरा दगडाने ठेचलेला असल्याने त्याची ओळख पटविणे ही कठीण झाले होते. पोलीस या घटनेचा पंचनामा करीत असताना पोलीसांना मयत तरूणाच्या खिशात मोबाईल मिळाला. त्या मोबाईल नंबरवरून त्यांनी मयत तरूणाची ओळख ऋषीकेश जाधव रा.मिरज अशी पटवली. घटनास्थळी पोलीसांनी श्वान पथकाला ही पाचारण केले. परंतु ते श्वान काही अंतरावर जाऊन घुटमळले. त्यामुळे पोलीसांच्या तपासाला गती येईना. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी मिरजेच्या शासकीय रुग्णायलयात पाठवून दिला. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना ऋषीकेश जाधव हा मिरज येथील त्याचे मित्र दीपक हलवाई आणि अक्षय पिसाळ याच्या बरोबर असल्याची माहिती मिळाली. या घटनेचा तपास मिरज ग्रामीण पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पोलीस ही करीत होती. स्थानिक गुन्हे अन्वेषनच्या पोलीसांना अक्षय पिसाळ हा सुभाषनगर येथे असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलीसांना सुभाषनगर येथून अक्षय पिसाळ याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे पोलीसांनी ऋषीकेश जाधव याच्या खुनाविषयी चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून या गुन्हयात आपल्याला आपला मित्र दीपक हलवाई याने मदत केल्याचे सांगितले. त्याच्या सांगण्यावरून पोलीसांनी दीपक हलवाई याला ही ताब्यात घेतले.त्याने ही आपला गुन्हा कबुल केला. या घटनेची लेखी फिर्याद मिरज ग्रामीण पोलीसात मयत ऋषीकेश जाधव याच्या नातेवाईकांनी दिली होती.त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी ऋषीकेश बाळासाहेब जाधव (वय २५) रा.घोरपडे वाडा, याच्या खून प्रकरणी अक्षय विश्वनाथ पिसाळ (वय २८) रा.कमान वेस माळी गल्ली मिरज, दीपक संजय हलवाई (वय २७) रा.पाटील गल्ली मिरज शहर याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२, २०१ प्रमाणे गुन्हा नोंदविला. त्या दोघांना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेल्या दुचाकी आणि त्यांनी काटेरी झुडूपात फेकून दिलेला दगड जप्त केला. या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजीव झाडे याच्या मार्गदर्शनाखाली मिरज पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. दारूची नशा करी जीवनाची दुर्देशा असे म्हणातात ते काही उगीच नाही तरी ही अनेक तरूण दारूच्या आहारी जाऊन नको ते करून बसतात. दारूची नशा चढली की ते मागचा पुढचा काही विचार करीत नाहीत मग त्याचे हातून खूनासारखी अघटित अशी घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

पान ८ वरून...

### नागपूर हिवाळी अधिवेशनासाठी ...

मंत्री श्री. चव्हाण यांनी म्हणाले की, दोन वर्षाच्या खंडानंतर अधिवेशन होत आहे. या पार्श्वभूमीवर निवास व्यवस्था तसेच अन्य सर्व व्यवस्था अद्ययावत करुन ते सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी. आवश्यक तेथे डागडुजी करावी. वीज, पाणी, स्वच्छता आदी सुविधा तत्काळ उपलब्ध होतील, असे नियोजन करावे. त्यासाठी पुरेशा कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी. तसेच शीघ्र प्रतिसाद दल कार्यान्वित करावे. निवास व्यवस्थेचे नियोजन करताना अद्ययावत तंत्रज्ञानाची मदत घ्यावी. मंत्री, लोकप्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी आदींच्या वाहन व चालकांची व्यवस्था तसेच आवश्यक तेथे सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करावी. स्वच्छतेसाठी तैनात कर्मचाऱ्यांची माहिती दर्शनी फलकांवर लावावी. नियुक्त मनुष्यबळ योग्य गणवेशात राहील याची खबरदारी संबंधित यंत्रणांनी घ्यावी, असेही निर्देश मंत्री श्री. चव्हाण यांनी दिले. हिवाळी अधिवेशनाच्या काळात करण्यात येणाऱ्या सर्व सोयी-सुविधांची एकत्रित माहिती असणारे मोबाईल ॲप तयार करावे. जेणेकरून त्या ॲपवर सर्व माहिती उपलब्ध होऊ शकेल, अशा सूचना मंत्री श्री. चव्हाण यांनी दिल्या. अपर मुख्य सचिव सौनिक यांनीही विविध सूचना केल्या. अधीक्षक अभियंता नंदनवार, कार्यकारी अभियंता कुचेवार यांनी निवास व्यवस्थेबाबत सुरू असलेल्या कार्यवाहीची माहिती दिली.

### महाआवास अभियान ग्रामीण अंतर्गत...

गटविकास अधिकारी आनंद मिरगणे मोहोळ, प्रभारी प्रकल्प संचालक उमेशचंद्र कुलकर्णी, मोहोळचे तहसीलदार प्रशांत बेडके पाटील, उपसभापती माळशिरस प्रताप पाटील यांना यांना प्रदान करण्यात आला. या उपक्रमांमुळे राज्य पुरस्कृत योजनेत विभागस्तरावर सर्वोकृष्ट तालुके (अक्कलकोट प्रथम, सांगोला व्दितीय, माळशिरस तृतीय) हे तीनही पुरस्कार सोलापूर जिल्हयाला प्रदान करण्यात आले. विभागस्तरीय महाआवास अभियान पुरस्कार मध्ये प्रधानमंत्री आवास योजना प्रथम पुरस्कार निंबर्गी ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक निलेश जोडमोटे, तृतीय पुरस्कार ग्रा.पं. मंद्रुप ता. दक्षिण सोलापूर चे ग्रामसेवक नागेश जोडमोटे व राज्य पुरस्कृत योजना तृतीय पुरस्कार ग्रा. पं. भंडारकवठे चे ग्रामसेवक संजय राठोड यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. माळशिरस तालुक्याने सर्वाधिक लाभार्थ्यांना महाआवास अभियान कालावधीत जागा उपलब्ध करून दिल्या त्याबद्दल माळशिरस तालुक्यास प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. विभागस्तरावर केंद्र व राज्य पुरस्कृत योजना अंतर्गत वाळु उपलब्धतेमध्ये सर्वोकृष्ट कामगिरी करणारे तालुके या उपक्रमांत प्रथम पुरस्कार हा अक्कलकोट तालुका व व्दितीय पुरस्कार मोहोळ तालुक्यास प्रदान करणेत आला.

दरम्यान महाआवास अभियानामध्ये सोलापूर जिल्हा परिषदेने विविध विभागामध्ये दमदार कामगिरी केली आहे. गोरगरीबांना घरे उपलब्ध करीन देणे साठी मोहिम राबविली. सर्वानी घेतलेले मेहनतीस फळ मिळाले आहे. अशी प्रतिक्रिया सिईओ दिलीप स्वामी यांनी दिली. तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे, गटविकास अधिकारी, जिल्हा प्रोग्रामर सरफराज शेख, सरपंच व ग्रामसेवक व ग्रामीण विकास यंत्रणा विभागाचे टीम ने मेहनत घेतली आहे. असेही सिईओ दिलीप स्वामी यांनी सांगितले.

### देशातील बांबू फर्निचर उद्योगाला ...

प्रशिक्षण असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या भेटीदरम्यान फिनिक्स फाउंडेशनच्या मार्फत त्यांना बांबूच्या विविध उपयोग आणि त्यात झालेले जगभराचे काम याविषयी माहिती व प्रशिक्षण देण्यात आले. सुरुवातीला संस्थचे अध्यक्ष पाशा पटेल यांनी बांबू क्षेत्रात ते करत असलेले काम आणि बांबूचे महत्व समजून सांगितले. त्यानंतर संजीव करपे (आंतरराष्ट्रीय बांबू तज्ञ) यांनी प्रेझेंटेशनाद्वारे बांबुपासुन जगभरात होणारे विविध प्रयोग आणि बांबु पासुन बनणाऱ्या विविध वस्तु या विषयीची माहिती दिली. त्यानंतर या प्रशिक्षणार्थीनी बांबु फर्निचर च्या कारखाण्यात भेट देऊन सविस्तर माहिती समजुन घेतली. मेघालय, आसाम, त्रिपुरा सारख्या बांबु बहुल राज्यातून प्रतिनिधीनी लातुर जिल्हातील लोदगा येथे प्रशिक्षण घेण्यासाठी फिनिक्स फाउंडेशनच्या बांबु केद्रामध्ये येणे हा आमच्या लातुर जिल्ह्यासाठी व मराठवाड्यासाठी बहुमान असल्याचे जेष्ठ शेतकरी नेते पाशा पटेल यांनी म्हटले. मागच्या महिन्यात मेघालय या राज्यातील ३० बांबू शेतकरी आणि बांबू कारागीर लोदगा येथील बांबू फर्निचर कारखान्याला भेट देऊन प्रशिक्षण घेण्यासाठी आलेले होते. लोदगा येथील बांबू फर्निचर कारखाना आता भारत देशातील एक आकर्षणाचे केंद्र बनले आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी राष्ट्रीय ग्रामीण विकास व पंचायत राज संस्था हैदराबाद चे सहयोगी प्राध्यापक श्री सुरजित विक्रमन हे उपस्थित होते.

### जनसंवाद अभियानातून केलेल्या...

यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास जाधव, पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार, पोलीस उपनिरीक्षक हिम्मतराव सरगर, गजानन जाधव, बाबासाहेब घुगे, चेतन सोनवणे यांच्यासह इतर पोलीस कर्मचारी, विकास चौधरी, तुळशीराम भुसारे व नाकाडपाडाचे ग्रामस्थ यांनी मोलाचे सहकार्य केले.

# दर्जेदार आणि विकासात्मक कामाच्या माध्यमातून मुंबईचा कायापालट - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## मुंबई सुशोभीकरण प्रकल्पांतर्गत विविध ५०० कामांचे मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमीपूजन




**मुंबई/प्रतिनिधी**

मुंबईकरांसाठी शहराचा विकासात्मक बदल करण्यास राज्य शासन प्रयत्नशील आहे. रखडलेले प्रकल्प पूर्णत्वास नेऊन आणि या शहराची आंतरराष्ट्रीय पातळीवरील ओळख अधिक ठळक करण्यासाठी आवश्यक बाबी निश्चितपणे करण्यात येतील. प्रत्येक काम दर्जेदार आणि पारदर्शकपणे केले जाईल. येत्या दोन वर्षात खड्डेमुक्त मुंबई करण्याचा संकल्प असून मुंबईकरांच्या हिताला आपले सर्वोच्च प्राधान्य असेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. गेट वे ऑफ इंडिया येथे आज मुंबई सुशोभीकरण प्रकल्पांतर्गत ५०० प्रकल्पांचे भूमिपूजन मुख्यमंत्री श्री. शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे बोलत होते. विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, शालेय शिक्षणमंत्री तथा मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, महिला व बालविकास, पर्यटन मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार ॲड. आशीष शेलार, मुंबई महानगर पालिका आयुक्त डॉ. इक्बालसिंह चहल, अतिरिक्त आयुक्त पी. वेलरासू आणि आशीष शर्मा आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. अनेकांच्या स्वप्नांना बळ देण्याचे काम हे शहर करते. सगळ्यांना सामावून घेणारे हे शहर आहे. त्यामुळे या शहरात पायाभूत सुविधा उत्तम दर्जाच्या असाव्यात, असा आमचा मानस आहे. त्यादिशेने आपण काम सुरु केले आहे. शहरातील रस्त्यांची दुरुस्ती आणि रिसर्फेसिंग करुन तर महत्वाचे रस्ते काँक्रिटचे करुन किमान ३० वर्ष ते टिकतील. यावर्षी पाचशे किलोमीटर रस्त्यांचे काम हाती घेतले जाणार आहेत, असे त्यांनी सांगितले. शहराच्या सौंदर्यीकरणाबरोबरच स्वच्छता, पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्यावर भर देत आहोत. पाच हजार स्वच्छता दूतांच्या माध्यमातून शहर स्वच्छ ठेवण्यासाठीचे नियोजन तयार आहे. मुंबई शहर एकीकडे विस्तारत असताना कोळीवाडे, तेथील संस्कृती, परंपरा जोपासण्याचे काम करण्यात येणार आहे. चार महिन्यात महानगरपालिका क्षेत्रात आपण ५२ बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरु केले, असे सांगून येत्या एक दोन महिन्यात मुंबईत दृश्य स्वरूपात बदल पाहायला मिळतील, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला. यावर्षी जी-२० परिषद आयोजनाचा मान आपल्या देशाला मिळाला आहे. त्यानिमित्त मुंबईसह राज्यातील इतर शहरात १४ बैठका आयोजित करण्यात येणार आहेत. यानिमित्त परदेशातून येणाऱ्या मान्यवर प्रतिनिधींसमोर मुंबई आणि आपल्या राज्याचे ब्रँडिग करण्याची संधी आपल्याला मिळाली आहे. मुंबईकरांच्या हिताचे अनेक निर्णय गेल्या साडेचार महिन्यांत घेण्यात आले. येथील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. त्याशिवाय रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यात येत आहेत, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, मुंबई शहर सौंदर्यीकरण प्रकल्प अतिशय चांगला उपक्रम आहे. या प्रकल्पामुळे सेवांचा दर्जा उंचावण्यास मदत होईल. राज्यात सत्तेवर आल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई विकासाचा आराखडा तयार करण्यास सांगितले. त्यामुळे ते या योजनेचे शिल्पकार आहेत. मुंबई शहरात सर्व सुविधा युक्त आकांक्षीत स्वच्छतागृहे बांधण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकल्पासाठी केंद्र सरकार निधी उपलब्ध करून देणार आहे. तसेच झोपडपट्टी परिसरात स्वच्छतागृहांची अधिकची तसेच पर्यायी व्यवस्था करण्याचा प्रयत्न सुरु आहे. सांडपाण्याच्या नियोजनासाठी कम्युनिटी वॉशिंग मशीन संकल्पना प्रत्यक्षात आणणे, झोपडपट्टी परिसरात अनेक ठिकाणी वीज नाही तेथे हँगिंग लाईट ही संकल्पना राबविण्याचे नियोजन सुरू आहे. ऐतिहासिक वारसा स्थळांचे महत्व जाणून त्याच पद्धतीने त्याची जपणूक करण्यात येणार आहे. स्काय वॉकच्या ठिकाणी एस्केलेटर्स बसविण्यात येतील.

आगामी काळात मुंबई या ऐतिहासिक शहरातील वास्तू आणि रस्त्यांचा चेहरामोहरा बदललेला दिसेल, असेही श्री. फडणवीस यांनी सांगितले. विधानसभा अध्यक्ष ॲड. नार्वेकर म्हणाले, आजच्या कार्यक्रमाच्या माध्यमातून मुंबई शहराच्या सौंदर्यीकरणाची वचनपूर्ती होत आहे. विकासाच्या बाबतीत सर्वांना अपेक्षित असलेला बदल आता पाहायला मिळेल, असे ते म्हणाले. शालेय शिक्षणमंत्री श्री. केसरकर म्हणाले, मुंबईला दैदीप्यमान इतिहास आहे. तो आणखी वृद्धिंगत करावयाचा आहे. मुंबईत स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतील. केंद्र सरकारचेही त्यासाठी पाठबळ असल्याचे त्यांनी सांगितले. महिला व बालविकास मंत्री श्री. लोढा म्हणाले, मुंबई शहर ही देशाची आर्थिक राजधानी आहेच. ती आता पर्यटन आणि रोजगार संधी निर्माण करणारी राजधानी व्हावी. त्या दिशेने राज्य शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. आमदार श्री. शेलार यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले, तर प्रास्ताविक आयुक्त श्री. चहल यांनी केले.

# 'लोकराज्य'चा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक प्रकाशित!




**मुंबई/प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर 'लोकराज्य'चा विशेषांक प्रकाशित केला आहे. महापरिनिर्वाण दिनानिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने प्रकाशित केलेल्या या विशेषांकात विविध मान्यवरांनी आपल्या लेखांतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याला उजाळा दिला आहे. यामध्ये प्रसिद्ध लेखक दत्ता भगत यांनी संविधान लेखकाचा उदय, डॉ. प्रदीप आगलावे यांनी डॉ. आंबेडरकरांचा राष्ट्रवाद, विवेक सौताडेकर यांनी चरित्र आणि विचारधन, डॉ. गंगाधर पानतावणे यांनी डॉ. आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता, प्रा. कुमुद पावडे यांनी स्त्री स्वातंत्र्याचे कैवारी, डॉ. किशोर जोगदंड यांनी डॉ. आंबेडकर एक इतिहासकार याविषयी लेखन केले आहे. शिवाय या अंकामध्ये डॉ. आंबेडकर यांचे पाली भाषेविषयी असलेले प्रेम अतुल भोसेकर यांनी मांडले आहे. कामगार चळवळीच्या माध्यमातून कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि अन्यायाला वाचा फोडण्यासाठी डॉ. आंबेडकर यांनी लढा देवून कामगारांना न्याय मिळवून दिल्याचे प्रा. डॉ. प्रवीण बनसोड यांनी डॉ.बाबासाहेब आणि कामगार चळवळ' या लेखातून मांडले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महान योद्धे आणि संविधान सभेतील मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने डॉ. आंबेडकर यांनी बौद्धिक परिश्रमातून भारतीय संविधान घडविले. यातूनच भारताच्या आधुनिक राष्ट्राची पायाभरणी झाल्याचे प्रा. अनंत राऊत यांनी संविधाननिष्ठ राष्ट्रवाद' या आपल्या लेखातून मांडले आहे. याशिवाय लोकराज्यमध्ये जातप्रमाणपत्र पडताळणीची प्रक्रिया, दिव्यांगांच्या शासकीय योजना, जलपर्यटन यासह राज्य शासनाने लोकोपयोगी घेतलेले निर्णय, योजनांची माहिती देण्यात आली आहे. हा अंक माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या https://dgipr.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच https://mahasamvad.in या पोर्टलवर वाचण्यासाठी मोफत उपलब्ध आहे.

# उत्कृष्ट लघु उद्योगांनी जिल्हा पुरस्कारासाठी अर्ज सादर करावे

**पालघर/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील उद्योग क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या लघु उद्योजकांना महाराष्ट्र शासनामार्फत जिल्हा पुरस्कार देण्यात येतात. सदर जिल्हा लघु उद्योग पुरस्कार प्राप्त करण्यासाठी अर्ज सादर करावे. पुरस्काराचे स्वरूप पुढीलप्रमाणे प्रथम क्रमांकास रु.१५,०००/- व व्दितीय क्रमांकास रु. १०,०००/- तसेच पुरस्कार विजेत्यांना मानचिन्ह, शाल व श्रीफळ देवून समारंभपूर्वक गौरविण्यात येते सदर पुरस्कारासाठी लघु उद्योगांची निवड त्यांनी केलेली भांडवली गुंतवणूक, तंत्रज्ञान, स्वावलंबन, उद्योजकता कौटुंबिक पार्श्वभूमी, उत्पादित वस्तु गुणवत्ता, निर्यातक्षमता इत्यादीचा विचार करण्यात येऊन जिल्हास्तराव समितीमार्फत उपरोक्त बाबीकरीता गुण देऊन गुणांकनानुसार प्रथम व द्वितीय पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. अर्जासोबत पुढिल कागदपत्रे जोडणे आवश्यक आहेत, विहित नमुन्यातील अर्ज, लघु उद्योग घटक हा मागील तिन वर्षे पूर्ण झालेला उद्यम नोंदणीकृत असावा, मागील तिन वर्षे उद्योग घटकाचे उत्पादन सुरु असावे, लघु उद्योग घटक कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा, यापूर्वी जिल्हा पुरस्कार, आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त घटक जिल्हा पुरस्कार योजनेस पात्र राहणार नाही, सनदी लेखापाल यांच्याकडील मागील तिन वर्षाचे ताळेबंदपत्रक व नफा तोटा पत्रक सादर करणे आवश्यक आहे. जिल्हा पुरस्कार योजना २०२२ करीता लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उद्योग घटकांनी दि. २५.१२.२०२२ पर्यत विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करून परिपूर्ण अर्ज महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पालघर या कार्यालयात सादर करावेत. याबाबत अधिक माहितीसाठी महाव्यवस्थापक यांचे कार्यालय, जिल्हा उद्योग केंद्र, पालघर, १०३, १ ला मजला, अ - नविन प्रशासकीय इमारत, कोळगांव, पो. ता. व जि. पालघर उद्योग अधिकारी, दिग्विजय पोळ (मोबाईल क्र. ८६५५५०९०६०) व विकी खिराळे (मोबाईल क्र. ९०२२७४९४२०), उध्दव माने, (९८२००६२९७५) इ-मेल आयडी- didic.palghargmail.com / didicpalgharmaharashtra.com येथे संपर्क करावा. असे आवाहन महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, पालघर यांनी केले आहे.

# तीन वर्षांपासून खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीच्या आवळल्या मुसक्या

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



१८ मे २०१९ रोजी सकाळी साडे सात ते आठ वाजण्याच्या सुमारास यातील फिर्यादी मल्लिकार्जून अण्णाराव पाटील हा मौजे शेगाव ता. अक्कलकोट जि. सोलापूर येथील महादेव दिंडुरे यांचे हॉटेल लगत असलेल्या पडीक मोकळया जागेवर त्यांचे इतर नातेवाईकांसोबत नेहमी प्रमाणे बोलत थांबले असताना, फिर्यादीचे चुलते व त्याचे मुले सदर ठिकाणी आले व त्यांच्यात बैलपोळा (कर्नाटक बेंदुर) या सणात मानपानावरून शिवीगाळ चालू असताना यातील फिर्यादीच्या भावावर महादेव अण्णाराव पाटील (मयत) याचेवर अग्निशस्त्राचा वापर करून त्यास जखमी केल्याने यातील फिर्यादीचे चुलते व त्याचे मुलांसह इतर ९ जणांविरूध्द अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे गुरंन २२९/२०१९ भादविसंक ३०२, ३०७ वगैरे आर्म अक्ट ३,२५ प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयामध्ये काही आरोपींना तात्काळ अटक करण्यात आली होती, परंतु त्यातील काही आरोपींचा त्यांचे व त्यांच्या नातेवाईकांच्या वास्तव्याच्या ठिकाणी वेळोवेळी शोध घेवून सुध्दा ते मिळून येत नव्हते. सदरचे आरोपी मिळून न आल्याने, त्यांचा मा. कोर्टात अहवाल सादर करण्यात आला होता. मा. कोर्टाने गुन्हयातील पाहिजे असलेल्या आरोपींना फरार घोषित करून त्यांना तात्काळ पकडणेबाबत आदेश दिले होते. सदर गुन्हयातील फरार घोशित केलेल्या आरोपींना तात्काळ पकडणेकामी वरिश्ठांच्या आदेशान्वये फरार आरोपींचे ठावठिकाणाची माहिती काढून त्यांना शोध घेवून त्यांना जेरबंद करणेकामी स्थानिक गुन्हे शाखेकडील सहा.पोलीस निरीक्षक, अनिल सनगल्ले व त्यांचे पथक फरार आरोपींचे मागावर असताना, त्यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सदर गुन्हयातील एक फरार आरोपी हा मौजे भतगुणगी ता. इंडी, जि. विजयपूर रा. कर्नाटक येथील त्याचे राहते घरी आला असलेबाबत खात्रीशिर बातमी मिळाल्याने, सदर ठिकाणी जावून सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीसांची मदत घेवून बातमीप्रमाणे आरोपी सदर ठिकाणी असल्याने खात्री करून त्यास ताब्यात घेवून पुढील कारवाई करीता अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणेच्या ताब्यात दिले आहे. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीश सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांचे नेतृत्वाखाली सहा. पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, सहा पोलीस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, विजया मोहिते, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर, प्रकाश कारटकर, धनाजी गाडे , मोहन मनसावाले, अनिस शेख, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, अक्षय डोंगरे, समीर शेख यांनी बजावली आहे.

# वलांडी येथे महावितरण कार्यालयसमोर शेतकरी संघटनेचा ठिय्या आंदोलनद!

## आंदोलनाची दखल घेत महावितरनच्या वतीने विजपुरवठा सुरळीत



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील वलांडी येथील महावितरणच्या कार्यालय समोर शेतकरी संघटनेच्या वतीने मंगळवार रोजी ठिय्या आंदोलन करण्यात आले. याची दखल घेत महावितरनच्या वतीने पन्नासहून अधिक रोहित्रचा विजपुरवठा सुरळीत करण्यात आली. विजबिलासाठी महावितरणाच्या वतीने बोंबळी (खुर्द), बोंबळी (बुद्रुक) टाकळी, हेंळब, धनेगाव, अनंतवाडी, जवळगा, कोरेवाडी, यासह आदी ठिकाणावरील ६० डिपीचा विजपुरवठा खंडीत करण्यात आला होता. खंडित करण्यात आलेला विज पुरवठा सुरळीत करा या प्रमुख मागणीसाठी शेतकरी संघटनेच्या वतीने वलांडी महावितरण कार्यालय समोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. खंडित करण्यात आलेल्या सर्व डिपीचा विजपुरवठा सुरळीत झाल्याशिवाय उठनार नाही आशी भुमिका शेतकऱ्यांच्या वतीने घेण्यात आली होती. याची दखल घेत महावितरनच्या वतीने खंडित करण्यात आलेल्या डिपी वरील विजपुरवठा सुरळीत करण्यात आला.

शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हा अध्यक्ष राजकुमार सस्तापुरे याच्या नेत्रत्वात ठिय्या आंदोलन पुकारण्यात आले होते. यावेळी विजपुरवठा खंडीत झालेल्या सर्वच गावातील शेतकरी उपस्थित होते उपकार्यकारी अभियंता देवणी व कनिष्ठ अभियंता वलांडी यांनी यापुढे पुर्व कल्पणा न देता विजपुरवठा खंडीत करनार नाही व सक्तीची विजबील वसुली करण्यात येणार नाही, व खंडीत केलेला विजपुरवठा सुरळीत करण्यात येईल आसे आश्वासन दिल्यावरच आंदोलनास माघार घेण्यात आली. यावेळी राजकुमार सस्तापुरे सुरेंद्र आंबुलगे, रामराव मेळकुंदे, विनायक पाटील, नारायण बंग, सोपान चेन्नेवार, सोमेश्वर हुरसनले, राजाराम पाटील, बालाजी भोसले, सतीष भोसले, प्रशांत महाजन, तानाजी भंडे, अरुण पाटील, व्यंकट शिंदे, यांच्यासह बहुतांश शेतकरी उपस्थित होते.

# येणकी येथून एका अल्पवयीन मुलीस फुस लावून पळविले; अज्ञात आरोपी विरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल

**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील येणकी येथून एका अल्पवयीन मुलीस फुस लावून पळविल्याची घटना घडली. या प्रकरणी अज्ञात आरोपी विरुद्ध देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती शुक्रवार दि.२ डिसेंबर रोजी देवणी पोलीसांच्या वतीने देण्यात आली. याबाबत देवणी पोलीसांच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, दि.२५ नोव्हेंबर रोजी रात्री साडे अकरा वाजण्याच्या सुमारास येणकी येथून फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीस अज्ञात आरोपीने अज्ञात कारणासाठी जाणीवपूर्वक फुस लावून पळवून घेऊन गेले आहे. या प्रकरणी मुलीच्या वडीलांच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर २७७/२०२२ कलम ३६३ भादवी प्रमाणे अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास हेडकाँस्टेबल नरेश उस्तुर्गे हे करीत आहेत.

# नालासोपाऱ्यातून तरुण बेपत्ता!



नालासोपारा पोलीस ठाणे मनुष्य मिसिंग नंबर ९९ / २०२२ रोजी यातील इसम नामे प्रीतम रवी दुर्वे वय २८ वर्ष रंग निमगोरा, उंची ६ फूट, केस काळे लांब, चेहरा उभट, अंगाने मजबूत, भाषा मराठी, हिंदी नेसूस पांढऱ्या रंगाचा, फुल बायाचा, कुर्ता व पायजमा, डाव्या बोटामध्ये सोन्याचे दोन, अंगठ्या सोबत सॅमसंग कंपनीचा मोबाईल मोबाईल क्रमांक ७९७७८०७६४५ अशा वर्णनाचा इसम हा दिनांक २३ /०८/ २०२२ रोजी संध्याकाळी १६/०० वाजता कामानिमित्त राजस्थानला जातो असे सांगून गेला तो अध्याप पावेतो परत आला नाही.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात विद्यार्थी मतदार नोंदणी विशेष शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी बी.पी.पृथ्वीराज आणि लातूरचे तहसीलदार स्वप्निल पवार यांनी निर्देशित केल्याप्रमाणे येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभाग व राज्यशास्त्र विभागाच्यावतीने दि.०६ ते ०८ डिसेंबर २०२२ या कालावधीमध्ये नवीन मतदार नोंदणी विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

याला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी मतदार नोंदणी करीत आहे. या विशेष शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.दिनेश मौने यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.रत्नाकर बेडगे, डॉ.शिवप्रसाद डोंगरे, डॉ.संजय गवई, प्रा.व्यंकट दुडिले, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, मधुकर निकुंबे, बिएलओ व्हि.एस.कांबळे, व्हि.पी.साबळे आणि एस.एम.हुडगे यांची उपस्थिती होती. नवीन मतदार नोंदणीसाठी एक फोटो, ओळखपत्र व रहिवासी पुरावा जोडणे आवश्यक आहे. ओळखपत्रामध्ये पॅन कार्ड, जन्म दाखला, ड्रायव्हिंग लायसन तर रहिवासी पुरावा म्हणून रेशन कार्ड, वीज बिल पावती, पाणी पट्टी पावती, गॅस कनेक्शन, पुस्तक, टेलिफोन बिल, बँक पासबुक, इन्कम टॅक्स पावती आदि कागतपत्रे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. पूर्ण भरलेला फॉर्म कागदपत्रासह महाविद्यालय जमा करण्यात आला असून त्याची पावती सुद्धा देण्यात आली आहे. या शिबिराच्या यशस्वितेसाठी आयक्यूएसी समन्वयक कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.भास्कर नल्ला रेड्डी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ.यशवंत वळवी, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. घन:श्याम ताडेवाड, प्रा.आशीष क्षीरसागर आदींचे सहकार्य लाभले आहे.

# जनसंवाद अभियानातून केलेल्या जनजागृतीमुळे नाकरपाडा पुर्णतः व्यसनमुक्त-बाळासाहेब पाटील




**वाडा/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यात जनसंवाद अभियानाचा प्रभाविपणे अवलंब केल्याने वाडा तालुक्यातील नाकरपाडा पुर्णतः व्यसनमुक्त झाला असल्याचे मत पालघर जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी व्यक्त केले.ते वाडा तालुक्यातील नाकरपाडा येथील जनसंवाद अभियानच्या कार्यक्रमात बोलत होते. ते पुढे म्हणाले की, पोलीस हा सर्वसामान्यांचा शत्रू नसून मित्र आहे. जनतेने पोलिसही सर्वसामान्य व्यक्ती आहे त्यांना न घाबरता तुम्ही तुमच्या समस्या, तक्रारी त्यांच्या समोर मांडू शकता. पोलीस प्रशासन जनतेच्या सेवेसाठीच आहेत. शुल्लक कारणा वरून आपसात भांडत बसण्यापेक्षा शांततेने संवाद साधला तर बरीच भांडणे मिटून जातील पोलीस ठाण्यात जाण्याची गरजच लागणार नाही. जनसंवाद योजने अंतर्गत एक गाव एक पोलीस संकल्पना राबवत असून या पोलिसाची मदत घेऊ शकता. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या संकल्पनेतून जनसंवाद अभियान वाडा तालुक्यात राबविला जात असून विविध शाळा, कॉलेज व खेड्या पाड्यांमध्ये जनजागृतीचे काम जोमाने चालू असून त्याचाच एक भाग म्हणून नाकरपाडा हे गाव व्यसनमुक्त झाले आहे, गावातील काही मुलींनी शाळेत जाने बंद केले होते त्या पुन्हा शाळेत जात आहेत, गावातील अनेक तरुण व्यसन मुक्त झाले आहेत, दारू बनविणे व विकण्याच्या व्यवसाय येथील महिलांनी बंद केला आहे. तर गावातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकेची सोय करण्यात आली आहे. जनसंवाद अभियान निमित्त केलेल्या जनजागृतीचे हे यश असल्याची माहिती पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांनी प्रस्ताविकेत दिली. सर्वप्रथम अभ्यासिकेचे उदघाटन बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले दरम्यान कायदे विषयक माहिती असलेल्या फलकांच्या प्रदर्शनला पाटील यांनी भेट दिली. व्यसनमुक्त झालेल्या तरुणांना पुष्पगुच्छ देऊन तर दारूबंदीस सहकार्य करणाऱ्या महिलांना साडी, पूष्पगुच्छ सत्कार करण्यात आला. पोलीस भरतीसाठी प्रशिक्षण घेणाऱ्या तरुणांना ट्रॅक शूट व प्रशिक्षणास उपयुक्त असे पुस्तक देऊन शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमास श्रामजीवी संघटनेचे महाराष्ट्र सरचिटनीस विजय जाधव, पत्रकार शरद पाटील, समाजसेवक ओमप्रकाश शर्मा, माजी सभापती रघुनाथ माळी, श्रामजीवी संघटनेचे वाडा तालुका अध्यक्ष भरत जाधव, विनीत ठाकूर, सरपंच साधना आणे यांच्यासह मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक संतोष वाघचौरे ...पान ६ वर

# वाडा येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन!





**वाडा/वार्ताहर**

विश्वरत्न, भारतरत्न, महामानव, भारतीयांचे उद्धारकर्ते भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त वाड्यात विनम्र अभिवादन करण्यात आले. ६ डिसेंबर १९५६ रोजी बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्ली येथे निधन झाले होते. त्यानिमित्त मंगळवारी (दि. ६ डिसेंबर) वाडा येथील खंडेश्वरी नाका येथे समाज बांधव व भगिनींनी एकत्र जमून बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तर उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांनी दाखविलेल्या शांतता, बंधुत्व व समानतेचा मार्गा व विचार आत्मसात करून आपला व आपल्या समाज बांधवांचा उद्धार साद्य करावा असे आवाहन करत आपले मनोगत व्यक्त केले. बाबासाहेबांच्या स्मृतीस अभिवादन करून आदरांजली वाहिली. या प्रसंगी डॉ. सुनिल भडांगे, बौद्धाचार्य जाधव गुरुजी, सिताराम जाधव, भाऊराव मोरे, नवनाथ लांडगे, संतोष पान पाटील, निहेश गायकवाड, वैभव पालवे, मस्के सर, बोरकर सर, नंदा बोरकर यांच्यासह इतरही समाज बांधव उपस्थित होते.

# नाही... म्हणजे नाही... सोलापूर जिल्हा परिषदेत जागोजागी झळकले लाचलुचपत प्रतिबंध विभागाचे फलक

**सोलापूर/प्रतिनिधी**




सोलापूर जिल्हा परिषद शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ.किरण लोहार यांना २५ हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई नुकतीच केली. या घटनेनंतर जिल्हा परिषदेतील प्रत्येक विभागासमोर नाही म्हणजे...नाही... असे फलक लाचलुचपत विभागाकडून स्टिकर्स चिटकविण्यात आले आहेत. या फलकाकडे जिल्हा परिषदेत येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे लक्ष जात असून या फलकावर नागरिकांतून साधक बाधक चर्चा होताना दिसून येत आहे. सोलापूर जिल्हा परिषदेत दिवाळी सणातच लाचखोरीची घटना उघडकीस आली. याप्रकाराने जिल्हा परिषदेचा कारभार जनमानसात बदनाम ठरला. सोलापूर जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्याकडून आवश्यक बदल व उपाय योजना करण्याच्या प्रयत्न करण्यात येत आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागानेही जिल्हा परिषदेत लाचखोरीला आळा घालण्यासाठी जनजागृती सुरु केली आहे. शासकीय कामासाठी लाच देणे व घेणे गुन्हा आहे. लाचेची मागणी होत असल्याने टोल फ्री क्रमांकावर नागरिकांनी संपर्क साधावा. संपर्क साधणाऱ्या व्यक्तींची माहिती गोपनीय ठेवण्यात येईल असे आवाहन लाचलुचपत विभागाकडून करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य प्रवेशद्वार, समाजकल्याण विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, ग्रामपंचायत, कृषी, बांधकाम, सामान्य प्रशासन, आरोग्य आदी विभागाच्या कार्यालयासमोर दर्शनी भागात नाही म्हणजे..नाही..असे ठळक फलक झळकत असल्याने नागरिकही सतर्क होताना दिसुन येत आहेत.

### फलक झळकले तरीही सिस्टीम शिक्षण विभागात सुरुच

जिल्हा परिषदेत लाचखोरीच्या घटनेनंतरही काही विभागात बिनधास्त जुनीच सिस्टीम सुरु असल्याची चर्चा नागरिकांतून होत आहे. लाच मागणी थेट न करता, येईल ते घेणारच असा प्रकार काही विभागात सुरु आहे. काही दिवसात पुन्हा बिनधास्तपणे सिस्टीम सक्रीय होईल अशीही चर्चा नागरिकांतून होत आहे.

# नागपूर हिवाळी अधिवेशनासाठी समन्वयाने नियोजन करावे – सा.बां. मंत्री रवींद्र चव्हाण

**मुंबई/प्रतिनिधी**



'कोविड – १९' मुळे नागपूर येथे दोन वर्षाच्या खंडानंतर विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन १९ डिसेंबरपासून सुरुवात होत आहे. या अधिवेशनासाठी येणारे लोकप्रतिनिधी, अधिकारी, प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी आदी सर्वाच्या निवासव्यवस्थेचे संबंधित सर्व विभागांनी काटेकोर आणि अचूकपणे नियोजन करावे. कोणाचीही कुठलीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी. हिवाळी अधिवेशनाच्या काळात केलेल्या सर्व व्यवस्थेची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होण्याच्यादृष्टीने मोबाईल ॲप तयार करावे, असे निर्देश सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री रविंद्र चव्हाण यांनी दिले. मंत्रालयातील परिषद सभागृहात विधिमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशन २०२२ च्या प्रस्तावित निवास व्यवस्था, स्वच्छता व्यवस्था, आहार व्यवस्था, वाय-फाय व्यवस्था, प्रसारमाध्यमांची व्यवस्था आदींचा सविस्तर आढावा मंत्री श्री. चव्हाण यांनी घेतला. यावेळी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, सामान्य प्रशासन विभागाचे सहसचिव सो. ना. बागूल, मृद व जलसंधारण विभागाचे सहसचिव सुभाष गावडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता दिनेश नंदनवार, कार्यकारी अभियंता अभिजित कुचेवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. नागपूरच्या विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिद्री आणि जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर नागपूर येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते....पान ६ वर

# शुभदाताई रेड्डी यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय पुरस्कार



**लातूर/प्रतिनिधी**

सामाजिक क्षेत्रात सक्रिय असणाऱ्या शुभदाताई रेड्डी यांना मुंबई येथील पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी धर्मपीठाच्या वतीने यावर्षीचा 'अहिल्यादेवी होळकर राष्ट्रीय पुरस्कार' पुणे येथे प्रदान करण्यात आला.हा पुरस्कार मिळाल्याबद्दल जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके यांच्यासह मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. शुभदा रेड्डी यांनी विविध क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेवून पुणे येथे झालेल्या एका कार्यक्रमात राष्ट्रसेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताअक्का कुमारीजी व मध्यप्रदेशच्या सांस्कृतिक कार्यमंत्री उषासिंह ठाकुर यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.धर्मपीठाचे अध्यक्ष सागर धापटे-पाटील यांची यावेळी उपस्थिती होती. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल रामचंद्र तिरुके यांच्यासह प्रसिद्ध साहित्यिका डॉ.वृषाली किन्हाळकर,लातूर अर्बन बँकेचे चेअरमन प्रदीप राठी, दीनानाथ सांगवे,चंद्रप्रकाश चितकोटे, व्यंकटराव गर्जे, सुनील कोचेटा यांनी रेड्डी यांचे अभिनंदन केले आहे.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमी येथे राज्यपाल, मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांनी केले अभिवादन

**मुंबई/प्रतिनिधी**



राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनी राज्यपाल भगत सिंह कोश्यारी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुष्पचक्र अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. दादर येथील चैत्यभूमी येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी आज शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, अन्न व औषध प्रशासन मंत्री संजय राठोड, विरोधी पक्ष नेते अजित पवार, खासदार राहुल शेवाळे, आमदार सर्वश्री संजय शिरसाट, प्रवीण दरेकर, सदा सरवणकर, कालिदास कोळंबकर, जयंत पाटील तसेच, प्रकाश आंबेडकर, आनंदराज आंबेडकर, मुंबई महापालिकेचे आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. अशोक स्तंभाजवळील भीम ज्योतीचे दर्शन घेतले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६६ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिका जनसंपर्क विभागामार्फत आयोजित छायाचित्र प्रदर्शनास मान्यवरांनी भेट दिली.बृहन्मुंबई महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते. मुंबई महापालिकेतर्फे प्रकाशित 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित माहिती पुस्तिका मान्यवरांना भेट देण्यात आली. यावेळी भंते बी. संगप्पा महाथेरो, सुमेध बोधी, धम्मप्रीय यांनी मान्यवरांच्या उपस्थिती वंदना पठण केली. चैत्यभूमी स्तूप येथे व्यवस्थापक भिकाजी कांबळे, प्रतीक कांबळे, रमेश जाधव, अध्यक्ष उत्तम मग्रे यांनी कार्यक्रमाचे व्यवस्थापन पाहिले.

# लातूर जिल्हयातील शेतकऱ्यांचा अश्वगंधा लागवड योजनेस चांगला प्रतिसाद!



**लातूर/प्रतिनिधी**

ट्वेन्टीवन ग्रीच्या ली., च्या वतीने शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या अश्र्वगंधा लागवड योजनेस लातूर जिल्हयातील सर्वच तालुक्यातील शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. या योजनेच्या माध्यमातून सहभागी झालेल्या शेतकऱ्यांच्या शेतात अश्वगंधा लागवड सुरू झाली आहे. अश्वगंधा लागवड करण्यासाठी आणखी काही शेतकऱ्यांना या योजनेत सहभाग घ्यायचा असेल तर ट्वेन्टीवन ग्री ली. च्या कार्यालयात संपर्क साधावा, असे आवाहन ट्वेन्टीवन ग्रीच्या संचालीका सौ. अदिती अमित देशमुख यांनी केले आहे. लातूर जिल्हयातील शेतकऱ्यांसाठी सुगंधी व औषधी वनस्पती लागवडीस चालना देण्यासाठी ५०० एकर क्षेत्रावर अश्वगंधा लागवडीचे उदिष्टये ट्वेन्टीवन ग्रीच्या माध्यमातून ठेवण्यात आले आहे. सदय परिस्थितीत या औषधी वनस्पतींना महत्व प्राप्त झाले आहे. शेतकऱ्यांना देखील यातून शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत उपलब्ध झाला आहे. मागील वर्षी योजनेत सहभागी शेतकऱ्यांना अश्वगंधा शेतीत चांगले उत्पन्न झाले. ट्वेन्टीवन ग्री ली.मूळे शेतकऱ्यांचा अश्वगंधा वनस्पती लागवड करण्याकडे कल वाढला आहे. लातूर तालुक्यात यशस्वी झलेली ही योजना यावर्षी पासून जिल्हाभरात राबवली जात आहे. लातूर जिल्हयातील जवळपास सर्वच तालुक्यातील शेतकरी ट्वेन्टीवन ग्रीकडून मदत, मागदर्शन घेऊन अश्वगंधा लागवड करीत आहेत. यावर्षी लातूर जिल्ह्यामध्ये ५०० एकर क्षेत्रावर अश्र्वगंधा लागवडीचे उद्दिष्ट आहे. या हंगामातील लागवड सुरू झाली असून आणखी ज्या शेतकऱ्यांना लागवड करायची इच्छा आहे त्यांनी ट्वेन्टीवन ग्री ली., पीव्हीआर टॉकीजच्या समोर, लातूर येथील कार्यालयात किंवा धनंजय राऊत ९२६००००८३, दत्ता वाघमारे ९६०४३०००२१ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन ट्वेन्टीवन ग्रीच्या संचालीका सौ. अदिती अमित देशमुख यांनी केले आहे.

# महाआवास अभियान ग्रामीण अंतर्गत सोलापूर जिल्हा परिषदेस १३ पुरस्कार प्रदान



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

महाआवास अभियान ग्रामीण अंतर्गत विभागीय स्तरावरील १३ पुरस्कार विभागीय आयुक्त सौरभ राव व अतिरिक्त आयुक्त अनिल रामोड यांचे हस्ते सिईओ दिलीप स्वामी यांना आज प्रदान करण्यात आले. महाआवास अभियान ग्रामीण २०२१-२२ मध्ये राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे पुरस्कार वितरण सभारंभ विभागीय आयुक्त कार्यालयातील झुंबर हॉल येथे पार पडला. सोलापूर जिल्हयास एकुण १३ पुरस्काराने सन्मानित करणेत आले. या पुरस्कार वितरण समारंभास उपआयुक्त विकास विजय मुळीक, उपायुक्त आस्थापना राहुल साकोरे, सहा आयुक्त सिमा जगताप काळे यांच्या प्रमुख उपस्थित होते. या प्रसंगी विविध पुरस्कार अतिरिक्त आयुक्त रामोड यांचे हस्ते मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी व तत्कालीन प्रकल्प संचालक तथा तत्कालीन प्रकल्प संचालक व सध्या वसुंधरा पाणलोट, जलसंधारण विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे यांना व तालुकास्तरीय पुरस्कार गटविकास अधिकारी सचिन खुडे अक्कलकोट, सांगोला चे गटविकास अधिकारी, विनायक गुळवे (माळशिरस), ...पान ६ वर

# देशातील बांबू फर्निचर उद्योगाला लोदगा आकर्षणाचे केंद्र -पाशा पटेल



**लातूर/प्रतिनिधी**

राष्ट्रीय ग्रामीण विकास व पंचायत राज संस्था हैदराबाद, या भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाच्या संस्थे मार्फत बांबू क्षेत्रात काम करणाऱ्या शेतकरी उत्पादक कंपनी (एफ.पी.ओ.) च्या प्रतिनिधीसाठी आणि स्टेट रुलर लाईव्हलीहूड मिशन (एसआरएलएम) चे राज्याचे प्रमुख अधिकारी यांच्यासाठी ५ डिसेंबर ते ९ डिसेंबर असा ५ दिवसाचा प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात देशातील ९ राज्यातील एफ.पी.ओ.च्या २० प्रतिनिधींनी भाग घेतला होता. यामध्ये मेघालय, त्रिपुरा, आसाम, तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा इत्यादी राज्यातील प्रतिनिधींचा समावेश होता. या प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून या प्रशिक्षणार्थींना दि. ११/०८/२०२२ रोजी लोदगा तालुका औसा जिल्हा लातूर येथील फिनिक्स फाउंडेशनच्या बांबू केंद्रास भेट व त्यांना एक दिवसाचे ...पान ६ वर